www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १७९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार,२९ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



■ 'जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत विविध निवृत्तीवेतन योजना...

पान ३ वर....



■ मुंबई विद्यापीठातर्फे पुनर्मूल्यांकनासाठी दरवर्षी लाखोंचा खर्च

पान ६ वर....

## मुख्यमंत्रीपदाचा तिढा नाहीच..गृहमंत्रिपदावरून रस्सीखेच !

● मुंबई, यश सावंत :



राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीतून एक पाऊल मागं घेत सर्वाधिकार मोदी-शहांना सोपवले. त्यानंतर मुख्यमंत्री भाजपचा होणार असल्याचे स्पष्ट झाले. दिल्लीत होत असलेल्या चर्चेनंतर मुख्यमंत्रिपदाचा तिढा सुटला असला तरी आता नवीनच पेच निर्माण झाला आहे. गृहमंत्रिपदावरून भाजप आणि शिवसेनेत रस्सीखेच सुरू असल्याचं सूत्रांकडून समजतंय.'''''

राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल सागून पाच दिवस उलटले तरी राज्यात सरकार स्थापन झाले नाही किंवा मुख्यमंत्रीही ठरलेला नाही. जुन्या विधानसभेचा कार्यकाळ संपल्यानंतरही सत्ता स्थापनेसाठी अद्याप जास्त हालचाली होताना दिसत नाहीय. महायुतीत मुख्यमंत्रीपदाचा पेच निर्माण झाला होता. मात्र एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाचा दावा सोडला आहे. मुख्यमंत्रीपदाचा दावा सोडला तरी एकनाथ शिंदे गृहखात्यासाठी आग्रही असल्याचे सांगण्यात येत आहे.

भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असलेल्या गृहखात्याची शिवसेना शिंदे गटाने मागणी केली आहे. मात्र भाजप गृहखातं सोडायला तयार नाही, अशीदेखील सूत्रांची माहिती मिळत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत गृह खात्याबाबत चर्चा आहे. अजित पवार यांच्याकडे अर्थ खातं कायम राहण्याची शक्यता आहे. मात्र शिंदे गृहखात्यासाठी अडून आहेत. महाराष्ट्रात गेल्या १० वर्षांपैकी साडे सात वर्षे गृहखातं देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. केवळ महाविकास आघाडीच्या काळात अडीच वर्षे या खात्याची जबाबदारी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याकडे होती.

पान २ वर

## दिल्लीमध्ये 'ईडी' पथकावर हल्ला, आरोपींकडून ईडीचे अतिरिक्त संचालकांना खुर्चीने मारहाण



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

देशाची राजधानी दिल्लीमधून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सायबर क्राईम प्रकरणातील तपास करायला आलेल्या अंमलबजावणी संचालायनाच्या पथकावर हल्ला करण्यात आला. दिल्लीमधील बिजवासन भागात घडलेल्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी ईडीने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, ईडीचे पथक PPPYL सायबर एप फ्रॉड प्रकरणातील आरोपी अशोक शर्मा आणि त्याच्या भावाच्या ठिकाणांवर छापा टाकण्यासाठी आले होते. दिल्लीतील बिजवासन भागात छापेमारी करताना पाच जणांनी त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यामध्ये ईडीचे अतिरिक्त संचालक जखमी झाले आहेत. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धक्कादायक म्हणजे हल्लेखोरांनी ईडी अधिकाऱ्यांच्या डोक्यात खुर्ची घातली. या प्रकरणातील आरोपी अशोक शर्मा आणि त्याच्या भावाने ईडी टीमवर हल्ला केल्याचा आरोप आहे. एफआयआर नोंदवण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे ईडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. या घटनेनंतर पोलिसांकडून आरोपींचा शोध घेतला जात आहे.

पान २ वर

## सिंधुदूर्गच्या किनारपट्टीच्या पाण्यात समुद्रतळ स्वच्छता मोहीम पार पडली



● सिंधुदुर्ग, दिगंबर जाधव :

मालवण येथे सागरी परिसंस्थेचे जतन करण्याच्या हेतूने वनशक्ती संस्थेतर्फे समुद्रतळ स्वच्छता मोहीम बुधवारी यशस्वीरीत्या पार पडली. ही मोहीम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एम. पी. सी. बी.), भारतीय मत्स्य सर्वेक्षण, मुंबई (एफ. एस. आय. – मुंबई) , नीलक्रांती संस्था आणि युथ बीट फॉर एनव्हारमेंट यांच्या सहकार्याने सिंधुदूर्गच्या किनारपट्टीच्या पाण्यात आयोजित केली होती.

या कार्यक्रमात स्थानिक स्वयंसेवक, पर्यावरणवादी आणि सागरी तज्ज्ञांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे समुद्रतळातून २५० किलोग्रॅमपेक्षा जास्त जैवविघटनशील नसलेला कचरा काढण्यात आला. सागरी परिसंस्थांच्या आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या प्लास्टिक प्रदूषण आणि इतर कचरा सामग्रीच्या वाढत्या धोक्याचा सामना करण्यावर या मोहिमेने लक्ष केंद्रित केले. स्कुबा डायव्हर्सच्या पथकांनी पाण्याच्या पृष्ठभागाखालील प्लास्टिक, मासेमारीच्या जाळ्या, बाटल्या आणि कालांतराने जमा झालेले इतर हानिकारक अवशेष गोळा केले. समृद्ध जैवविविधता आणि स्वच्छ किनाऱ्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या सिंधुदूर्गमधील या सागरी परिसंस्थेचे संरक्षण करण्याच्या उपक्रमांमध्ये ही स्वच्छता मोहीम अत्यंत महत्वाची आहे.

## मुंबईतील गोवंडीत बनावट नोटांसह एकाला अटक



● मुंबई, राकेश गायकवाड :

बनावट नोटा चलनात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका आरोपीला शिवाजी नगर पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी आरोपीकडून ५०० आणि २०० रुपयांच्या एकूण २३ नोटा जप्त केल्या असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. रामलूश मिंझ (५१) असे अटक आरोपीचे नाव असून तो गोरेगाव परिसरातील रहिवासी आहे.

पान २ वर

## साडेतीन वर्षीय मुलाला ६० हजारांना विकले; शेजाऱ्याचे दुष्कर्म, तिघांना अटक

● ठाणे, सुचिता देशमुख :



शेजारी राहणाऱ्या इसमाने साडेतीन वर्षाच्या मुलाला मुंबईत अवघ्या साठ हजार रुपयात विकले असल्याची खळबळजनक घटना शांतीनगर परिसरातील रामनगर येथे घडली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता शांतीनगर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या साहाय्याने अवघ्या बारा तासात मुलाचा शोध घेत याप्रकरणी शेजाऱ्यासह इतर दोन जण असे तिघांना अटक केली असल्याची माहिती शांतीनगर पोलिसांनी मंगळवारी दिली आहे. मोह. युनूस अमिनुद्दिन शाह (वय ५३ वर्ष रा. रामनगर झोपडपट्टी, भिवंडी), पिर मोह. रफिक अहमद शाह (वय ३९ वर्ष) व समसुद्दीन मुख्तार शाह (वय ४५ वर्ष दोघे रा. सेवक नगर, साकी नाका कुर्ला ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तिघा आरोपींची नावे आहे.

अमन हरवल्याप्रकरणी त्याचे वडील मो. वदुद हलीम उल्लाह अंसारी वय २७ वर्ष यांनी शांतीनगर पोलीस ठाण्यात तक्रारदाखल केली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी विधानसभा निवडणुकीचा बंदोबस्त असतानाही मुलाच्या शोधण्यासाठी वेगवेगळया टीम तयार केल्या होत्या. तपासात घराशेजारील मोहम्मद युनूस शहा यांनी साडेतीन वर्षाच्या मुलाला हॉटेलमध्ये नेऊन खाऊ दिले व सोबत नेल्याची सीसीटीव्ही फुटेज समोर आले. त्यानंतर शांतीनगर पोलिसांनी तपासाची सूत्र हलवून अवघ्या १२ तासाच्या आत मोहम्मद युनुस शहा यास ताब्यात घेत त्याच्याकडून कसून चौकशी केली असता त्याने मुलाचे अपहरण केल्याची व मुलाला कुर्ला येथील पीर मोहम्मद रफीक अहमद शहा यास दहा बारा वर्षांपासून मूल होत नसल्याने त्याला मुलाला ६० हजार रुपयात विकल्याची कबुली दिली.

पान २ वर

## नाशिक शहरात शनिवारी पाणी पुरवठा बंद ! नागरिकांना सहकार्य करण्याचे महापालिकेचे आवाहन

● नाशिक, सचिन कदम :



शहरात पाणी पुरवठ्यातील समस्यांवरून निवडणुकीआधी बराच गदारोळ उडाल्यामुळे आचारसंहिता संपताच महानगरपालिका आणि स्मार्ट सिटी कंपनी यांनी पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी धडपड सुरू केली आहे. पाणी वितरणाशी संबंधित विविध कामे शनिवारी करण्यात येणार असून त्यामुळे या दिवशी संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. रविवारी कमी दाबाने पाणी पुरवठा होईल.

नाशिक स्मार्ट सिटी कंपनी आणि मनपा पाणी पुरवठा वितरण विभाग यांच्यातर्फे विविध जलशुध्दीकरण केंद्र आणि सहायक केंद्रांवर प्रवाह मीटर, व्हॉल्व्ह बसविणे यासह इतर कामांचे नियोजन करण्यात आले आहे. पंचवटी जलशुध्दीकरण केंद्रात उच्चदाब खांब स्थलांतरीत करणे, गांधीनगर जलशुद्धीकरण केंद्रात प्रवाह मीटर बसविणे, नाशिकरोड जलशुद्धीकरण केंद्रात विविध ठिकाणी प्रवाह मीटर, व्हॉल्व्ह बसविणे, शिवाजी नगर जलशुद्धीकरण केंद्रात विविध ठिकाणी प्रवाह मीटर बसविण्याचे काम करण्यात येणार आहे.

पान २ वर

## लोकल व अटल सेतूमुळे मोरा-मुंबई जलवाहतुकीवर परिणाम; बोटमालक अडचणीत

लोकल व अटल सेतूमुळे मोरा-मुंबई जलवाहतुकीवर परिणाम; बोटमालक अडचणीत

● उरण, भावना जैन :



स्वातंत्र्यपूर्व काळापासून उरणच्या मोरा व मुंबईतील भाऊचा धक्का दरम्यान मोरा मुंबई जलसेवा सुरू आहे. मात्र जानेवारी महिन्यापासून सुरू झालेली उरण नेरुळ/ बेलापूर लोकल व अटलसेतुमुळे उरणच्या मोरा ते मुंबई या जलमार्गावर परिणाम झाला असून दिवसाची प्रवासी संख्या ५०० ची असलेली प्रवासी संख्या घटून २५० वर येऊन पोहचली आहे. त्यामुळे या मार्गावरील फेरीसाठी येणारा खर्च ही निघत नसल्याने जलवाहतूक करणारे बोटमालक अडचणीत आले आहेत.

ब्रिटिश काळापासून मुंबईत ये-जा करण्यासाठी उरणच्या मोरा व मुंबईतील भाऊचा धक्का दरम्यानची जलसेवा सुरू आहे. मुंबईत अवघ्या अर्ध्या ते एक तासात या मार्गाने पोहचता येते. त्यामुळे उरण मधील चाकरमानी, व्यवसायिक आणि सर्वसामान्य प्रवासी ही याच मार्गाचा वापर करीत होते. मात्र १२ जानेवारीपासून उरण ते नेरुळ/ बेलापूर ही लोकल सेवा तसेच खासगी वाहनांच्या माध्यमातून प्रवास करता येईल असा उरणला जोडणारा अटलसेतू हा सागरी मार्ग असे पर्याय उपलब्ध झाले आहेत.

सध्या उरणवरून थेट मुंबई सीएसएमटी गाठता येत नसली तरी अवघ्या २० रुपयांत सर्वात स्वस्त व जलद गतीने मुंबईत जाता येत असल्याने लोकलने प्रवास करण्यास प्रवाशांनी पसंती दिली आहे. दुसरीकडे अटल सेतूने खासगी वाहनाने अवघ्या २५ मिनिटांत मुंबईत जाता येत असल्यामुळे या दोन्ही मार्गाचा अवलंब करीत प्रवास केला जात आहे. त्यात पावसाळ्यात मोरा मुंबई या जलमार्गावरील प्रवासाच्या तिकीटाचे दर वाढविण्यात येतात याचाही परिणाम प्रवासी संख्या घटण्यावर झाली आहे. याचा सर्वांचा मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या बोट व्यवसायावर परिणाम झाला आहे.

पान २ वर

## रेल्वे रुळाला तडा, रेल्वे कर्मचाऱ्याच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला

● नागपूर, नितीन देवळेकर :



रेल्वे कर्मचाऱ्याच्या सतर्कतेमुळे धामणगाव रेल्वे स्थानकानजीक मोठा अनर्थ टळला. रेल्वे रुळाला मोठा तडा गेल्याचे लक्षात येताच ट्रॅकमॅनने चार किलोमीटर धावत जाऊन गांधीधाम-पुरी एक्स्प्रेस रोखल्याने अपघात टळला. भोलाराम मीना असे या ट्रॅकमॅनचे नाव असून त्याचे कौतुक केले जात आहे. धामणगाव रेल्वे नजीक भोलाराम मीना हे गुरुवारी सकाळी रेल्वे रुळाची तपासणी करीत होते.

यावेळी त्यांना एका ठिकाणी रेल्वे रुळाला सांध्याच्या ठिकाणी मोठा तडा गेल्याचे दिसले. या मार्गावरून काही वेळातच गांधीधाम-पुरी एक्स्प्रेस जाणार होती. भोलाराम यांनी सुमारे चार किलोमीटर धावत जाऊन ही एक्स्प्रेस वेळेत थांबवली. या कामगिरीबाबत भोलाराम यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

पान २ वर

## 'लाडक्या बहिणीच्या नावावर हवा तसा निकाल लावला गेला..'- अविनाश जाधव




● कोल्हापूर, विशाल पाटील :

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल मनसेला मान्य नाही. उमेदवारांचे म्हणणे राज ठाकरे यांनी ऐकून घेतले आहे पण त्यांनी अद्याप आपले मत व्यक्त केलेले नाही. ते बोलतील तेव्हा निवडणूक प्रक्रियेवर प्रकाशझोत पडेल, असे मत मनसे नेते अविनाश जाधव यांनी व्यक्त केले. महायुतीने मनसेची फसवणूक केली असल्याचा आरोप त्यांनी केला.

राज्यभरात १२८ उमेदवार रिंगणात उभे करून एकही जागा न पटकावलेल्या मनसेने अबोला धरला होता. गुरुवारी महालक्ष्मी देवीचे दर्शन घेतल्यावर जाधव यांनी पत्रकारांशी संवाद साधताना चुप्पी तोडली. ते म्हणाले, जे आमदार कोणाला भेटत नव्हते, ते लाख मतांनी निवडून आले. मी खात्रीने सांगतो मतयंत्राशिवाय ही गोष्ट अशक्य होती. भाजपाचा विजय झाल्याने अनेक पक्षांना उतरती कळा लागली आहे. अमेरिकेसारख्या देशात मतपत्रिकेवर निवडणुका होत असतील तर इथे का नको? मनसे २०१९ सालीही हेच म्हणत राहिली. आता खात्रीने सांगतो की, आमची फसवणूक झाली आहे. लाडक्या बहिणीच्या नावावर हवा तसा निकाल लावला गेला असल्याचा आरोप त्यांनी केला.

## आता दुचाकीवरील दोघांनाही हेल्मेटसक्ती, वाहतूक विभागाचे आदेश

● पुणे, अभिजित येरल्लू :



विना हेल्मेट दुचाकीस्वार व सह प्रवासी यांचे अपघात व त्यात मृत्युमुखी तसेच जखमी होणाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे विना हेल्मेट दुचाकीस्वार व पाठीमागे बसलेल्या दोघांवर कारवाई करण्याचे आदेश वाहतूक विभागाचे अपर पोलिस महासंचालकांनी राज्यातील सर्व पोलिस आयुक्त व पोलिस अधीक्षकांना दिले आहेत.

विधानसभा निवडणुकीनंतर त्वरित हा आदेश काढण्यात आला आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांना हेल्मेट सक्ती करण्याविषयी रोष व्यक्त केला जात आहे. आत्तापर्यंत केवळ विना हेल्मेट असलेल्या दुचाकीचालकांवर कारवाई करण्यात येत होती.आता मात्र सहप्रवाशावर देखील करवाई केली जाणार आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांच्या ई-चलन मशिनमध्ये बदल करण्यात आला आहे.

केवळ सहप्रवाशावर कारवाई करण्याची तरतूद त्यात करण्यात आल्याचे महासंचालकांनी काढलेल्या पत्रात नमूद आहे. सध्या विनाहेल्मेट वाहनचालकांवर सीसीटीव्हीमार्फत देखील कारवाई केली जात आहे.पुणे शहरात दररोज अशा प्रकारे सुमारे चार हजार चालकांवर कारवाई केली जाते.मात्र त्यातून दंड भरणाऱ्यांची संख्या कमी आहे.

हेल्मेटविना दुचाकी चालविल्याप्रकरणी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने पुण्यातील सुमारे १० हजार वाहनचालकांवर कारवाई केली. यातून ४४ लाख ५७ हजार रुपयांचा दंड वसूल केला. ही कारवाई 'आरटीओ'च्या वायुवेग पथकाने १ एप्रिल ते ३१ ऑक्टोबर २०२४ दरम्यान केली. गेल्या काही दिवसांपासून सरकारी कार्यालयांत दुचाकीवर येणाऱ्यांना हेल्मेट अनिवार्य केले आहे.

पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# मोदी-शहांची सत्तेवर पुन्हा घट्टपकड

समजा महाविकास आघाडीने भाजपला धोबीपछाड दिला असता तर काँग्रेसच्या अंगावर मणभर मास चढले असते आणि त्यांचे नेते झोकात संसदेत आले असते. अदानी समूहाच्या लाचखोरीचा मुद्दा आयता सापडलेलाच आहे. त्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींची कोंडी करण्याचा प्रयत्न झाला असता. आताही संसदेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये तसा प्रयत्न होणार नाही असे नव्हे; पण महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील पराभवाने विरोधकांच्या पोतडीतील हवा निघून गेली आहे. त्यामुळे अदानीवरून कितीही गदारोळ विरोधकांनी केला तरी भाजपला फारसा फरक पडेल असे वाटत नाही. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी अगदीच गलका केला तर लोकसभाध्यक्ष सभागृहाचे कामकाज तहकूब करत राहतील. हिवाळी अधिवेशनात केंद्र सरकार आणि भाजप अधिक ताकदवान झालेला दिसेल. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींची सत्तेवरील पकड सैल होत असल्याचा भ्रमही निघून गेलेला असेल. खरे तर हरियाणा आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांमध्ये भाजपने मिळवलेला अभूतपूर्व विजय केवळ मोदींचा नव्हता. उलट, मोदींनी तुलनेत कमी प्रचार केला. मोदींचा चेहरा हा भाजपच्या प्रचाराचा केंद्रबिंदू नव्हता. दोन्ही राज्यांतील विजयामागे मोदींशिवाय इतर अनेक कारणे आहेत. पण विजय भाजपचा झाल्याने श्रेय आपोआप मोदींच्या पदरात पडले आहे आणि मोदी त्यांच्या श्रेयाचे नाणे खणखणीतपणे वाजवणार हे निश्चित ! लोकसभा निवडणुकीमध्ये संघाने भाजपला मदत केली नव्हती. पण हरियाणा आणि महाराष्ट्रातील निवडणुकांमध्ये संघ सक्रिय झालेला होता. संघाच्या मदतीविना भाजपला फारसे यश मिळत नाही हे खरे असले तरी मोदी-शहांच्या वर्चस्वाला धक्का द्यायचा म्हणून भाजपला फटकारण्याचे धोरण संघाला फार काळ चालू ठेवता आले नाही कारण, केंद्रातील सत्ता कमकुवत झाली तर संघाला नको असलेल्या 'डाव्या' विचारांच्या घटकांना बळ मिळते. मोदी-शहांपेक्षा संघाला या डाव्या विचारांच्या संस्था-संघटनांची अधिक भीती वाटते. त्यामुळे संघाने लोकसभा निवडणुकीतील अलिप्ततेचे धोरण बाजूला ठेवून मोदी-शहांना पाठिंबा दिला. दोन्ही राज्यांत भाजपला जिंकून दिले. पण, त्याचा परिणाम म्हणजे मोदी-शहांची भाजप-संघ आणि केंद्र सरकारावरील पकड घट्ट होणार आहे. ही बाब कितीही नको असली तरी संघाला मान्य करावी लागणार आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये मोदींनी विरोधकांना धूप घातलेली नव्हती. पण यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमत मिळवता आले नाही, सरकार बनवण्यासाठी 'एनडीए'तील घटक पक्षांच्या कुबड्या घ्याव्या लागल्या. विरोधकांची ताकदही वाढली. त्यामुळे घटक पक्षांच्या, विरोधकांच्या दबावाला बळी पडावे लागले. अन्यथा वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेच्या संयुक्त समितीकडे पाठवावे लागले नसते. समितीच्या बैठकांमध्येही प्रचंड वादंग माजला होता. आता महाराष्ट्रासारखे महत्त्वाचे राज्य ताब्यात आल्यानंतर केंद्र सरकार पूर्वीच्या जोमाने काम करू लागेल. हिवाळी अधिवेशनातच वक्फ दुरुस्ती विधेयक संमत केले जाण्याची शक्यता आहे. इथून पुढे पाच वर्षे आत्तासारखी तडजोड करून सरकार चालवण्याची शक्यता कमी दिसते. गेल्या लोकसभेत अविश्वास ठरावात मणिपूरच्या मुद्द्याची अवघ्या काही मिनिटांमध्ये मोदींनी वासलात लावली होती. तेच आक्रमक मोदी पुन्हा पाहायला मिळतील. आत्ता दिसत असलेला घटक पक्षांचा दबावदेखील मोदी झुगारून देतील, असे दिसते. गेल्या दहा वर्षांमध्ये अनुच्छेद ३७० वगैरे अजेंडे बिनदिक्कतपणे पूर्ण केले गेले तसेच समान नागरी कायदा, एक देश एक निवडणूक अशा नव्या अजेंड्यांची तितक्याच धडाडीने पूर्तता केली जाईल. पुढील वर्षी जनगणनेचे काम सुरू होईल. त्यामध्ये जातीनिहाय जनगणनेचा समावेश करण्याचाही दबाव महाराष्ट्रातील विजयानंतर उरलेला नाही. 'एक है तो सेफ है' आणि योगी आदित्यनाथांच्या 'बटेंगे तो कटेंगे' या दोन नाऱ्यांनी देशातील राजकीय आणि सामाजिक वातावरण बदलून टाकले आहे. हिंदुत्वाच्या आणि राष्ट्रवादाच्या या मुद्द्यांनी राहुल गांधींचा जातनिहाय जनगणनेचा मुद्दा हाणून पाडला आहे. - विकास शिवराम पाटील त्याचे परिणाम उत्तर प्रदेशसारख्या मोठ्या राज्यांमध्ये भाजपसाठी अनुकूल ठरण्याची शक्यता अधिक दिसते. उत्तर प्रदेशातील विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपने मिळवलेले यश त्याचेच द्योतक ठरते. लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षित यश न मिळण्यामागे योगींचे असहकार्य कारणीभूत होते, शिवाय समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी बिगरयादव ओबीसींना दिलेली उमेदवारीही भाजपला त्रासदायक ठरली होती. पण महाराष्ट्राच्या निकालामुळे रेवडी (योजनांचा पैसा व आर्थिक देवाणघेवाण ) आणि हिंदुत्व या दोन डगरीवर हात ठेवला तर विजय निश्चित असल्याचा अनुभव भाजपला आलेला आहे. पुढील काही वर्षे तरी याच दोन डगरींवर हात ठेवून भाजप केंद्रात सत्ता राबवण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

महाराष्ट्रात जसे घटक पक्ष क्षुल्लक ठरू लागले आहेत, तसेच केंद्रातही नजीकच्या भविष्यात घटक पक्ष बिनमहत्त्वाचे ठरण्याची शक्यता आहे. भाजपकडे २४० सदस्यांचेच संख्याबळ आहे; पण काही काळात ते बहुमतापेक्षा जास्त झालेलेही दिसू शकेल. हा बदल करणे भाजपसाठी फारसे अवघड ठरेल असे नव्हे !

संसदेचे सोमवारी सुरू होणारे हिवाळी अधिवेशन अदानीच्या मुद्द्यावरून दोन-चार दिवस वादळी होईलही. पण कमकुवतझालेला विरोधी पक्ष भाजपला कितपत अडचणीत आणू शकेल याबाबत शंका घेता येऊ शकेल. महाराष्ट्रामध्ये काँग्रेस, शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना या तीनही पक्षांनी सपशेल मार खाल्ला आहे. झारखंडमध्ये विरोधकांनी विजय मिळवला असला तरी त्याचे श्रेय काँग्रेसपेक्षाही झारखंड मुक्ती मोर्चाकडे जाते. याआधी झालेल्या जम्मू- काश्मीरच्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसची कामगिरी इतकी खराब होती की, 'नॅशनल कॉन्फरन्स'ला सत्ता टिकवण्यासाठी काँग्रेसची गरज उरलेली नाही. हरियाणामध्ये काँग्रेसचा कसा धुव्वा उडाला हे देशाने पाहिलेले आहे.

# भटकंती गोव्याची - प्राचीन सुन अपरांतची

## गोव्याचा प्राचीन इतिहास आणि लेण्यांबद्दलची जागरुकता, त्यांच्या संवर्धनाची गरज

गोव्यात ३० हून अधिक लेण्या असून पुरातत्व विभागाने त्यापैकी १०-१२ लेण्या हया संरक्षित केल्या आहेत, तर इतर लेण्यांचे देखील संवर्धन होणे गरजेचे आहे. त्यापैकी काही लेण्यांची आता मंदिरे झाली आहेत. काही लेण्या हया खाजगी मालकीच्या जागेत असल्यामुळे त्या पहाता येत नाही. तर काही लेण्या हया मलब्यामध्ये सापडल्या असुन त्याचे उत्खनन होणे गरजेचे आहे. आम्ही एकजूट लेणी अभ्यास प्रचारक समुह, महाराष्ट्र राज्य च्या १३ सदस्यांनी १-३नोव्हेंबर २०२४ च्या दरम्यान गोवा लेणी अभ्यास दौ-यात एकूण १० लेण्या व इतर काही संरक्षित स्थळे पाहिले असून त्याबददल थोडक्यात माहिती देण्याचा प्रयत्न करतीय.

भारतामधील पश्चिम घाटातील ग्रीन स्टोनमध्ये वसलेल्या गोवा राज्याच्या उत्तरेला महाराष्ट्र राज्य पूर्व आणि दक्षिण दिशेला कर्नाटक तर पश्चिम बाजूला अरबी समुद्र आहे. एक उत्कृष्ठ पर्यटन स्थळ म्हणुन गौवा राज्य जगप्रसिद्ध असुन जगातील अनेक पर्यटक प्रतिवर्षी गोव्यामधील अनेक पर्यटनस्थळांना भेटी देत असतात. इतिहास संशोधक गोव्याच्या इतिहासाचा पहिला कालखंड प्राचीन काळ तर दुसरा कालखंड पोर्तुगीज कालखंड म्हणून विचारात घेतात. इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून ते अकराव्या शतकाच्या मध्यापर्यंत, भीज राजवट ते शिलाहार राजवटीपर्यंत सुमारे सातशे वर्षे लेखनाची भाषा संस्कृत होती. भोज राजसत्तेच्या काळातील सहा अभिलेख तर शिलाहार काळातील केवळ तीन अभिलेख संशोधनासाठी सध्या उपलब्ध आहेत. इस १२३६ या कालावधीतील गोव्यामध्ये म्हापसा या ठिकाणी नागदेवाचा ताम्रपट प्राप्त झाला आहे. तेराव्या व चौदाव्या शतकातील संस्कृत, मराठी, ब्राम्ही, नागरी, कानडी लिपीतील शिलालेख, ताम्रपट इत्यादी स्वरुपाचे पुरावे गोव्यामध्ये प्राप्त झाले आहेत. सुनअपरांत : पालीमध्ये सुन म्हणजे सोने, अपरांत म्हणजे प्रदेश, सोन्याचा प्रदेश. बांधकाम उदयोगातील गुणवत्तेसाठी प्रसिदध असलेल्या कोलावले नदीच्या वाळूमध्ये शुदध सोन्याचे कण आणि खनिजे असलेले सोन्याचे परमाणू खूप जास्त असल्याचे आढळतात. १६०० वर्षापूर्वी धातुशास्त्राचे ज्ञान असलेल्या बौध्द भिक्षूंना कोलावले नदीच्या वाळूमध्ये सोन्याचे महत्व आधीच माहिती होते. पाली ग्रंथ अंगुत्तर निकाय च्या (३.१०.१०) "पांसुधीवक सुत्ता" मध्ये वाळुच्या कणांच्या साठ्यामधून सोन्याच्या पुनरूत्पत्तीची प्रक्रिया वर्णन केली आहे. या प्रकियेचे वर्णन केवळ धर्माशी संबंधित (म्हणजे धार्मिक किंवा नैतिक सद्गुण) टिकवून ठेवण्यासाठी मनातील विविध वाईट विचार काढून टाकण्याचे स्पष्टीकरण देण्यासाठी रुपक म्हणून सुंदरपणे वापरले गेले. गोल्डन वॉशर म्हणजे पांसुधीवक या शब्दाचा शाब्दिक अर्थ जो बाळू साफ करती किंवा धुतो असा आहे. गोवा आणि आजूबाजूच्या कोकण प्रदेशाला सुवर्ण-सीन अपरांत असे नाव देणा-या बौध्दांनी नदीच्या किनारी छावण्या उभारल्या होत्या असे अभ्यासकांचे मत आहे. इसवीसन १६४७ च्या पोर्तुगीज दस्तऐवजात कोलावले येथील बौध्द विहाराचा संदर्भ आहे. पोर्तुगीजपूर्व काळात बौद्ध व्यापारांच्या माध्यमातून गोव्याच्या किना-यावर बौध्द धम्म पोहोचला होता. १९३० मध्ये फादर हेन्री हेरासने बारडेज मधील मुशीरवाडा कोलावले येथे बुध्दाचे एक शिल्प सापडले होते. त्यामुळे कोलवले येथे बुध्द विहार होते असे म्हटले असे मत मांडले. पणजीतील महामाई कामत (आदिलशहा हाऊस जवळ) यांच्या घराच्या बांधकामाच्या वेळेला बुध्दांचे गांधार शैलीतील ४-५ शतकातील पितळेचे शिल्प सापडले होते जे आता गोव्याच्या संग्रहालयात ठेवण्यात आले आहे. भीज राजांच्या काळात काही बौध्द व्यापा-यांनी ते गोव्यात आणले असावे असे अभ्यासकांचे मत आहे. शिल्पाचे परीक्षण केल्यावर असे दिसून येते की, बौदध वसाहत लक्षणीयरीत्या मीठया प्रमाणात होती. ज्या काही ठिकाणी सोन्याचे कण आणि सोने असलेले खनिजे आढळून येतात त्यामध्ये धारबांदीरा, संगुए, क्युपेम, मांडीबी, आमीना, कोलवाले, केरी, उगवेम, तेरेखोल हया साईटस आहेत. गोवा सरकारने पर्यावरण संवेदनशील पश्चिम घाट कुलेम, शिगाव, ॲगलोटे, रिवोना, उगयूम आणि संगुएममधील सोन्याचे समृद्ध ठिकाणे अचूकपणे ओळखली आहेत. चालुक्य, कदंब आणि विजयनगर साम्राज्य पश्चिम घाटातील सोन्याच्या स्त्रोताचे गुप्तपणे रक्षण करत होते. भारताने पूर्व ऐतिहासिक आणि प्राचीन काळात आशियामध्ये उत्पादन केलेल्या एकूण सोन्यापैकी अंदाजे ५० टक्के सोन्याचे उत्पादन केले.

१७६६ मध्ये इस्ट इंडिया कंपनीतील कारकून जेम्स फोर्बस बॉम्बे येथे आले असता ते १८ वर्षे भारतात राहिले आणि त्यांनी देशभर प्रवास केला. पुढे त्यांनी सांगितले की दक्षिण भारतातील नेलांबूर नदी आणि मलबारच्या इतर प्रर्वतीय प्रवाहामध्ये देखील सोने सापडले होते. १८८१ मध्ये प्रकाशित झालेल्या ारतीय भूगर्भशास्त्राचे नियमपुस्तिका, खंड ३ या प्रसिद्ध ग्रंथात भारतीय ज्या नदयांच्या गाळामधून सोन्याचे उत्पन्न मिळवित होते त्या नद्यांचे तपशीलवार वर्णन दिलेले आहे.

चंद्रपुरच्या भोजांच्या काळात, भोज आसंकीताची हिंगुटटी ताम्रपट मध्ये भगवान बुध्दांच्या शिल्पाला वंदन करतो, तसेच विहारातील भिक्षूंना अनुदान देतो. पृथ्वीमलवर्मन या भीज राजाने बुद्धदास नावाच्या एका बौध्दाची नेमणूक केली होती. असंकिताने सनदेच्या शिक्कामध्ये बुध्दांच्या जन्माचे प्रतिक म्हणून हत्तीचा वापर केला. गोव्यावर राज्य करणा-या कोकणच्या मौर्यांच्या राज्यकर्त्यांनी चंद्रवर्मनच्या काळात हरवलेम किंवा शिवापुरात बसलेल्या महाविद्दाराला जमीन दान देऊन बौध्द भिखखूंना संरक्षण दिले. कदंबानी बौध्द धम्माच्या तांत्रिक पंथाला पाठिंबा दिला. बौध्द धम्मापूर्वी कोकण / गोव्यात प्रामुख्याने अरबी सागर बंदरातून डेक्कनमधील बाजरपेठांशी जीडणारे व्यापारी मार्ग होते. चीन व भारत



यांच्या दरम्यानच्या रेशीम मार्ग (सील्क रूट) मध्ये गोव्याचा देखील उल्लेख येती. चक्रवर्ती सम्राट अशोकामुळे मौर्य काळातच गोव्यात बौध्द धम्माचा मीठया प्रमाणात प्रचार प्रसार झाला होता. कोकण मौर्य शासक चंद्रवर्मन यांच्या ताम्रपटात इस. ५०० मध्ये शिवापूरच्या बौध्द विहारांना जमीन दान दिल्याचा उल्लेख आहे. काही विद्वानांनी शिवापूरची ओळख अस्वलेम लेणी म्हणून केला आहे. शिवापूर हा पींडा तालुक्यातील शिरोडा येथील परीसर होता असे देखील मत व्यक्त करतात. भोज शासक असमिकताने बौद्ध धम्माचे संरक्षण केले होते आणि त्याच्या ताम्रपटात दीपक विषयाच्या सुंदरिकाच्या अनुदानाचा संदर्भ आहे. सुंदरिका सुंदर पेठ आणि दिपका विषय डिबीली (विचीलीम) अशी त्यांची नावे आहे. लामगाव म्हणजे लामा किंवा बौद्ध भिख्खूंचे गाव आणि लेणी-निवासस्थान. लामगाव लेणी आता वायू व ध्वनी प्रदुषणाने त्रस्त असलेल्या तीव्र खाणकामांनी वेढलेली आहे. ग्रीटली वोन मिटरबॉलनर या जर्मन महिला इतिहासकाराने गोव्याच्या वारसा स्थळाचा अभ्यास केला होता. तीने लामगावाची लेणी बौध्द लेणी म्हणून उल्लेख केला होता. संगुएमधील रिव्होना नैसर्गिक गुहेचा वापर बौध्द भिक्षूंनी केला होता. पोंडयातील पंचवाडीला काही इतिहासकार महायान बौध्दांचे केंद्र म्हणून सांगतात जे नंतर वज्रयान केंद्र म्हणून विकसित झाले. अभ्यासकांचे मत आहे की गोव्यात राहणारे बौध्द भिखू, महायानाचा अभ्यास आणि उपदेशा व्यतिरिक्त लोखंड वितळण्याचे काम करत. गोव्यात अनेक ठिकाणी लोखंड बांधलेले मातीचे पाईप सापडले. बौध्द धम्मातील बज्रयान पंथातील चामुंडेश्वरीच्या पीठावर वज्र चिन्ह आहे. कोलाबळे, लामगाव आणि रिबोना येथे बौध्द भिक्षूंनी येथे लेण्या / नैसर्गिक गुहा वापरली असण्याची शक्यता आहे. रिबीना गुहा पूर्णपणे दुर्लक्षित अवस्थेत पडून होती. गोवा- गोपिकपट्टणम आणि चांदीर ही प्राचीन बंदरे १४ देशांच्या व्यापारी संबंधामुळे भरभराटीस आली होती. चांदीर चंद्राला अल इंदिरसी, अल-ममुदी, रशीद-उल-दीन आणि इबन बतूता यांनी सिंदाबूर किंवा सांदबूर देखील म्हटले आहे. पेरिप्लस ऑफ द एरिथ्रीयन सी च्या लेखकाने इस पहिले शतक गोव्याला एगिड्डी, नेलकिंडा, एजिद्दी किंवा एजिडिओई म्हणून केली आहे. प्लिनीने गोव्याला नेलकिंडा किंवा नेकानिर्डॉन म्हटले आहे. टॉलमी ने मेलिंडा, अरब नाविकांनी गोव्याला कुवा किंवा कुवे म्हटले. चंद्रपुरच्या उत्खनाने सातवाहनांचा प्रदिर्घ इतिहास सांगितला. बंदराचे अवशेष पाहण्यासाठी ऑफशोअर गोपिकापट्टणम बंदरात जाता येते. इ.स. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात मॅकासार बेटावर गोवा नावाचे राज्य होते, ज्यावर गोव्यातील पोर्तुगीजांचे व्यापारी संबंध होते. गोव्याच्या पश्चिमेला अरबी समुद्र आणि उर्वरित भाग पश्चिम घाटाने वेढलेला आहे. चांदीर आणि गीपकपट्टण ही गोव्याची राजधानी होती. परीडा किंवा कुशावती नदीच्या काठावरील चंद्रपुरा किंवा चांदीर हे गोव्यातील सर्वात जुने बंदर आहे. चंद्रपुर उत्खननात बीसीई दुस-या शतकातील सातवाहन काळातील विटा आणि मातीची भांडी आढळून आली आहेत. गोपकपट्टणजवळील पिलर टँकमध्ये रोमन नाणी, आंफोरे शेडस आणि मातीची भांडी सापडली जे दर्शविते कि सातवाहन काळात रोमन जहाजांचे गोव्याच्या बंदरात संपर्क होता. शिलाहार आणि कदंब यांचा पश्चिम आशिया आणि पूर्व आफ्रिकन देशांशी व्यापारी संपर्क होता. चार स्मारक दगड शिल्प नौदल युद्धासह सागरी क्रियाकल्पांचे चित्रण करण्यात आले आणि पुरातत्व संग्रहालय, जुने गोवा येथे प्रदर्शित केले गेले. हे चित्रण १२व्या शतकात गोव्यातील कदंबांच्या उत्तर कोकणातील नौदल हल्यांच्या मालिकांचे असु शकते असे अभ्यासक सांगतात. इजरायलच्या इफा विद्यापीठात गोपकपट्टणला भेट देणा-यांचे काही पुरावे आहेत. इफा युनिर्व्हसिटी, इजरायलच्या दस्तऐवजानुसार ज्यु लोकांच्याही या भागात वसाहती होत्या. ज्यू साहित्यात त्याचा उल्लेख होता. त्यांनी गोपकपट्टण बंदरातून बरेच सोने घेतले व ते सर्व सोने भूमिगत बोगद्यातून आणले होते. किनारी भागात नैसर्गिक गुहा होत्या. कोलारजवळ अनेक लहान प्राचीन सोन्याच्या खाणी होत्या. १४व्या शतकात होननावरच्या सुलतान जमाल-अल-दीनने गोव्याच्या बंदराची तोडफोड करुन जाळली असली तरी ती कल्याणसारखी नाहीशी झाली नाही. गोवा हे व्यापाराच्या दृष्टीने सोयीचे बंदर होते त्यामुळे ते चालू राहिले. पुरातत्व आणि ऐतिहासिक पुराव्यावरुन हे सिद्ध होते की चांदीर गोपाकापट्टण आणि जुने गोवा ही गोव्याची महत्वाची व्यापारी केंद्रे आणि बंदरे होती. गोवा आणि भारताच्या भरभराटीचे मुख्य कारण म्हणजे प्राचीन गोवा बंदरे. त्याचा मोठा सागरी इतिहास आहे. तरीही गोवा आणि तिथल्या संस्कृतीबद्दल सखोलपणे जाणून घेण्यासाठी संशोधन आणि उत्खनन करण्यासारखे बरेच काही आहे. सन १५१० मध्ये पोर्तुगीज एडमिरल अल्बुकर्क यांनी गोवा जिंकला आणि ते पोर्तुगीजांच्या भारतीय सत्तेचे पहिले गव्हर्नर जनरल बनले. भारतातील पहिली नगरपालिका इ.स. १५११ मध्ये पोर्तुगीज राजवटीत निर्माण झाली. इ.स. १५५० मध्ये भारतातील पहिली प्रिंटिंग प्रेस गोवा या ठिकाणी स्थापन झाली. त्याचकाळात भारतातील सर्वात जुने पुराभिलेखागार गोव्यामध्ये अस्तित्वात आले. इ.स. १५९५ मध्ये गोव्यात एक दप्तरखाना स्थापन केला गेला. हे गोव्यामधील पहिले पुराभिलेन होय. या पुराभिलेखागारत तसेच लिस्बन येथील दप्तरखान्यात अनेक महत्वाचे ग्रंथ व अभिलेख आहेत. सदर अभिलेखात युरोपीय लोकांनी आशिया व आफिका खंड तसेच भारतात केलेल्या व्यापारसंबधी उपयुक्त माहिती प्राप्त होते. इ.स. १५७५ ते १६२५ हा काळ गोव्यातील पोर्तुगीज सत्तेचा सुवर्णकाळ मानला जाती. या काळात पोर्तुगीज सत्तेच्या नेतृत्वाखाली गोव्याने प्रचंड प्रगती केली. या काळात गोव्याला लिस्बन सारखे नागरी विशेषाधिकार दिले गेले. मसाल्याच्या स्वतंत्र बाजारपेठा उभारल्या गेल्या. एक काळी, गौतम बुध्दांच्या मानवतावादी विचार आणि आदर्श गोव्यात बहरले होते. बौध्द विहारे आणि शिल्पांसाठी अनेक ठिकाणे प्रसिध्द होती. आज यापैकी अनेकांचा नाश आणि-हास झाला आहे. जे काही अवशेष सध्या आहेत ते देखील संरक्षित नाही. तरुण पिढीला या बौध्द वारशाची माहीती देखील नाही. गोव्यातील वारसा समृद्ध आहे आणि आपण त्याला योग्य महत्त्व दिले पाहीजे. आपल्या सत्तरीतील दुर्गम भाग आणि रिवीना सारखी गावे किंवा ग्रामीण भागातील काही टेकडयांमध्ये भरपूर वारसा संपत्ती आहे. हा केवळ आपला वारसा नाही तर आपला इतिहास आहे. केवळ आपल्या राजेशाहीचा नाही तर आपल्या लोकांचाही आहे. मात्र यांकडे शासनाचे आणि तथाकथित संवर्धनवादयांचे दुर्लक्ष आहे. आम्ही पाहिलेल्या काही स्थळांवर पुरातत्व विभागाने चांगल्यापैकी काम केले आहे, परंतु जुने झालेले बोर्ड बदललेले नाहीत. पुरातत्व विभागाने गोव्यातील लेण्यांचे एखादे मार्गदर्शक पुस्तिका तयार करुन पर्यटकांना सहज उपलब्ध होईल याची सोय करावी. आजही संपूर्ण भारतात सर्वाधिक पर्यटक गोव्यात येतात ते समुद्रकिनारे, चर्चे पाहण्यासाठी त्यांना लेण्या पाहण्यासाठी देखील तयार केले पाहिजे पण त्यासाठी आधी त्याचा प्रचार प्रसार होणे महत्वाचे आहे.

- प्रफुल्ल पुरळकर (लेणी संवाद)

## पान १ वरून...

### दिल्लीमध्ये 'ईडी' पथकावर हल्ला,...

तसेच ईडी पथकाची सुरक्षाही वाढवण्यात आली आहे. अंमलबजावणी संचालनालयाच्या उच्च-तीव्रता युनिट (HIU) ने भारतभर कार्यरत असलेल्या मोठ्या सायबर गुन्हेगारी नेटवर्कशी जोडलेल्या शीर्ष चार्टर्ड अकाउंटंटच्या विरोधात शोध सुरू केला. फिशिंग घोटाळे, क्यूआर कोड फसवणूक आणि अर्धवेळ नोकरी घोटाळयांसह हजारो सायबर गुन्ह्यांमधून बेकायदेशीर निधीची लाँड्रिंग उघडकीस आले आहे. त्यानंतर ही छापेमारी केली जात आहे.

### आता दुचाकीवरील दोघांनाही हेल्मेटसक्ती,...

पुणे 'आरटीओ'च्या वायुवेग पथकाने ऑक्टोबरमध्ये ४ हजार १६५ वाहनांची तपासणी केली.पैकी २ हजार १७५ दुचाकीचालकांनी हेल्मेट घातले नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली.यातून सुमारे १० लाख २९ हजार रुपयांचा दंड करण्यात आला. हेल्मेट नसेल तर ५०० रुपयांचा दंड आहे. विभागीय आयुक्त यांनी आदेश दिल्यानंतर 'आरटीओ' प्रशासनाने हेल्मेट न घालता दुचाकीने सरकारी कार्यालयांत येणाऱ्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. यासाठी चार पथके तयार करण्यात आली आहेत.

### नाशिक शहरात शनिवारी पाणी पुरवठा...

या शिवाय सहायक जलशुध्दीकरण केंद्रात याच स्वरुपाची कामे केली जातील.

सातपूर विभागातील मुख्य वाहिनीवर व्हॉल्व्ह आणि पाणी मापक मीटर बसविणे, सातपूर प्रभाग क्रमांक नऊमधील कार्बन नाका येथील वाहिनीची गळती थांबविणे, प्रभाग १० मधील अशोकनगर येथे गळती लागलेल्या ९०० मिलिमीटर वाहिनीची दुरुस्ती, गोविंदनगर जॉगिंग ट्रॅक येथील जलवाहिनीची दुरुस्ती, पाथर्डी फाटा येथील व्हॉल्व्ह दुरुस्ती, कशिश हॉटेलजवळील जलवाहिनीवरील व्हॉल्व्हची गळती बंद करणे तसेच हॉटेल रेडिसन ब्लू येथील आनंदनगर कुंभाच्या वाहिनीवरील गळती बंद करणे. स्मार्ट सिटी कंपनीमार्फत वासन नगर, राणेनगर, पाथर्डी फाटा येथील जलवाहिन्यांवर व्हॉल्व्ह बसविणे व तत्सम कामे केली जातील. नाशिकरोड विभागातील उपनगर येथील संजय गांधी नगर वाहिनीतील गळती आणि पवारवाडी जलकुंभ भरणाऱ्या वाहिनीची जेलरोड सिग्नलजवळ गळती बंद करण्याची कामे करण्यात येणार आहेत.

व्यापक स्वरुपातील कामांमुळे शनिवारी सकाळी आठ ते रात्री आठ या वेळेत शहरात पाणी पुरवठा करणे शक्य होणार नाहू. रविवारी कमी दाबाने पाणी पुरवठा होईल. शनिवारी दिवसभर संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा बंद राहील. नागरिकांनी नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### रेल्वे रुळाला तडा, रेल्वे कर्मचाऱ्याच्या...

याबाबत रेल्वे प्रशासनाला माहिती मिळताच रेल्वे कर्मचाऱ्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. रेल्वे रुळाच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले. गांधीधाम-पुरी एक्सप्रेस सुरक्षितपणे या मार्गावरून नेण्यात आली. रेल्वे ट्रॅकमॅनच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला. रेल्वे वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला नाही. रेल्वे रुळाची देखभाल ही अत्यंत महत्वाची मानली जाते. रेल्वे मार्गावर देखरेख ठेवण्याचे काम ट्रॅकमॅन हे कुठल्याही ऋतूत, प्रतिकूल हवामानात देखील करीत असतात. त्यांच्या दक्षतेमुळे अनेक अपघात टळले आहेत.

### मुंबईतील गोवंडीत बनावट नोटांसह...

शिवाजी नगर परिसरातील रफिक नगर येथील एका दुकाना आरोपी बुधवारी गेला होता. दुकानातून काही सामान घेतल्यानंतर त्याने दुकानदाराला २०० रुपयांची नोट दिली. मात्र दुकानदाराला या २०० रुपयांच्या नोटबद्दल संशय आला. त्यामुळे त्याने काही स्थानिक रहिवाशांच्या मदतीने आरोपीला पकडले आणि याबाबत शिवाजी नगर पोलिसांना माहिती दिली. बनावट नोटांबाबत माहिती मिळताच शिवाजी नगर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आरोपीची झडती घेतली असता त्याच्याजवळ ५०० आणि २०० रुपयांच्या एकूण २३ बनावट नोटा सापडल्या. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता या नोटा विक्रीसाठी स्वतःकडे ठेवल्याची माहिती त्याने दिली. पोलिसांनी त्याला अटक केली असून आरोपीने या नोटा कुठून आणल्या याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### लोकल व अटल सेतूमुळे मोरा-मुंबई...

पावसाळयात प्रवासी संख्या कमी असली तर इतकी कमी कधीच नव्हती त्यामुळे बोटींचा खर्चही निघत नसल्याची माहिती बोट चालकांनी दिली आहे. उरणवरून थेट मुंबई सीएसएमटी गाठता येत नसली तरी अवघ्या २० रुपयांत सर्वात स्वस्त व जलद गतीने मुंबईत जाता येत असल्याने लोकलने प्रवास करण्यास प्रवाशांनी पसंती दिली आहे. दुसरीकडे अटल सेतूने खासगी वाहनाने अवघ्या २५ मिनिटांत मुंबईत जाता येत असल्यामुळे या दोन्ही मार्गांचा अवलंब करीत प्रवास केला जात आहे.

### साडेतीन वर्षीय मुलाला ६० हजारांना...

शांतीनगर पोलिसांनी त्वरित कुर्ला येथून पिर मोह. रफिक अहमद शाह, समसुद्दीन मुख्तार शाह या दोघांना अटक करून त्यांच्या तावडीतून साडेतीन वर्षांच्या अमनची सुटका करून त्यास आई वडिलांच्या ताब्यात दिले.

सदरचा तपास शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे, सर्जेराव पाटील, पो. हवालदार संतोष मोरे, संतोष पवार, रिजवान सय्यद, महाले, पोलीस नाईक किरण जाधव, दिनेश भुरकूड, पोलीस शिपाई रोशन जाधव, प्रशांत बर्वे, मनोज मुके, दीपक सानप, रवी पाटील यांच्या पथकाने केली आहे.

### मुख्यमंत्रीपदाचा तिढा नाहीच..

महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक महायुतीने एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात लढली होती. प्रचाराचा केंद्रबिंदू एकनाथ शिंदेच राहिले आहेत. महायुतीचे प्रमुख नेते वेळोवेळी तेच ठामपणे सांगत होते. पण विधानसभा निवडणुकीत भाजपने प्रचंड यश मिळवत १३२ जागांवर विजय मिळवल्यानंतर मुख्यमंत्री भाजपचाच असेल अशी मागणी पुढे आली. मात्र शिंदे सेनाही मुख्यमंत्रीपदासाठी आग्रही होती. एकनाथशिंदेंच्या माघारीनं भाजपचा मुख्यमंत्री होणार यावर जवळपास शिक्कामोर्तब झाल्याचं बोललं जातं असताना आता गृहखात्यावर घोडं अडलं आहे. दिल्लीतील बैठकीत राज्यातील सरकार स्थापनेबाबत मोठा निर्णय होणार आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत विविध निवृत्तीवेतन योजना सुलभतेने राबवण्यासाठी अधिकारी-कर्मचारी यांचे प्रशिक्षण

**ठाणे (रोहित जैसवार) -** जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या विविध निवृत्तीवेतन योजना सुलभतेने राबवण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने आज, दि. २८ नोव्हेंबर, २०२४ रोजी जिल्हा परिषदेच्या सभागृहात अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. NSDL (Protean) कार्यालयात सहाय्यक प्रबंधक या पदावर कार्यरत असणारे सुर्यकांत तरे यांनी उपस्थित सर्वांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) ची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शन केले.





यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र) अविनाश फडतरे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी अंजली अंबेकर तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्यालय, ठाणे जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती मधील निवृत्तीवेतन योजना संदर्भातील कामकाज हाताळणारे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीच्या खात्यावरील जमा रक्कमेतून गुंतवणूक करण्याबाबत विविध पर्याय, अंशतः रक्कम आहारीत करणे, सेवा निवृत्ती वेतन योजनेचे विविध पर्याय, कर्मचारी मृत्यू पावल्यास त्याचे कुटुंब निवृत्ती वेतन, राजीनामा, रुग्णतः निवृत्ती वेतन या सर्व योजनेबाबत सखोल मार्गदर्शन सुर्यकांत तरे यांनी केले.

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) ची योग्य पद्ध तीने अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी तसेच अनेक शंकाबाबत अधिकारी-कर्मचारी यांच्या समवेत चर्चा करण्यात आली.

# कल्याण डोंबिवली पालिकेची नागरी सुविधा केंद्रे सुट्टीच्या दिवशीही सुरू

**कल्याण (गणेश बागडे) –** कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही मालमत्ता कर देयकांचा भरणा करता यावा म्हणून पालिका प्रशासनाने १ डिसेंबरपासून पालिकेची दहा प्रभाग हद्दीतील नागरी सुविधा केंद्रे शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही कार्यालयीन वेळेसारखी सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

पालिका हद्दीतील बहुतांशी करदाता हा नोकरदार, व्यावसायिक आहे. त्यांना कामाच्या दिवशी पालिकेत येऊन मालमत्ता कर भरता येत नाही. त्यामुळे नोकरदार, उद्योजक, व्यावसायिक करदात्यांचा विचार करून प्रशासनाने सुट्टीच्या दिवशीही सुविधा केंद्रे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके मालमत्ता करधारकांना पालिकेकडून वितरित करण्यात आली आहेत. मालमत्ता कराची चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीची कराची रक्कम ३१ डिसेंबर २०२४ पूर्वी पालिकेत भरल्यास चार टक्के आणि ऑनलाईन भरणा केल्यास दोन टक्के सवलत देण्याचे पालिकेने यापूर्वीच जाहीर केले आहे.



ज्या मालमत्ता करधारकांनी अद्याप मालमत्ता कराचा भरणा केलेले नाही. त्यांना नोटिसा बजावण्याची कार्यवाही प्रशासनाने सुरू केली आहे. कर भरण्यासाठी टाळाटाळ करणाऱ्या नागरिकांवर पालिकेकडून कठोर कारवाईचे पाऊल उचलले जाणार आहे. मालमत्ता कराच्या थकित रक्मेवर दोन टक्के रक्मेची दंडात्मक कारवाई करणे, इमारत, चाळी, आस्थापनेला असलेल्या नळ जोडण्या खंडित करण्याची कारवाई सुरू करण्यात येणार आहे, असे पालिका अधिकाऱ्याने सांगितले. एवढ्या कारवाया करूनही थकबाकीदार मालमत्ता कर भरणा करत नसेल तर त्यांची मालमत्ता जप्त केली जाईल.

# 'गायमुख घाट रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम वेगाने मार्गी लावा'

**ठाणे (सचिन कदम) :** घोडबंदर रस्त्यावरील वाहतुकीच्या दृष्टीने गायमुख घाट अत्यंत महत्त्वाचा असून त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम वेगाने मार्गी लावावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. घाटातील कामासाठी वन विभागाची परवानगी आवश्यक असून ती डिसेंबर अखेरपर्यंत मिळाल्यास पुढील चार महिन्यात घाट रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने देण्यात आली.

घोडबंदर रस्त्यावरील वाहतुकीच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेसह विविध यंत्रणा, जस्टीस फॉर घोडबंदर रोड हे स्थानिक नागरिकांचे प्रतिनिधी यांची बैठक सप्टेंबर महिन्यात झाली होती. त्याचा पाठपुरावा करण्यासाठी गुरूवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

गायमुख घाट रस्ता येथील रस्त्याच्या दुरुस्तीविषयी अजूनही तक्रारी असून संपूर्ण रस्त्याचे योग्य पद्धतीने डांबरीकरण करण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली. दूचाकी वाहनांसाठी हा घाट मार्ग अजूनही धोकादायक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासंदर्भात, भविष्यात कॉंक्रिटीकरण होणार आहे म्हणून आता रस्ता किरकोळ दुरुस्ती करून तसाच ठेवता येणार नाही. त्यामुळे तो सर्व वाहनांसाठी योग्य राहील अशी गुणवत्तापूर्ण दुरुस्ती करावी, असे आयुक्त राव यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींना सांगितले.

घाट रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचा कार्यादेश तयार असून वन विभागाच्या मान्यतेसाठी सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आल्याची माहिती यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली. डिसेंबरअखेरपर्यंत ही परवानगी मिळाल्यास जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यात घाट रस्त्याचे कॉंक्रिटीकरण पूर्ण करण्यात येईल, अशी माहितीही देण्यात आली.

कापूरबावडी आणि कॅडबरी उड्डाणपूलाच्या दुरुस्तीचे काम रेंगाळले असल्याची तक्रार नागरिकांनी केली. त्यावर,



कंत्राटदार आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात त्यावर बोलणी सुरू असून तेही काम लवकरच पूर्ण होईल, असे स्पष्ट करण्यात आले.

घोडबंदर रोडवरील वाहतूक समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाहतूक पोलीस, प्रादेशिक परिवहन विभाग, मेट्रो आदी यंत्रणा दक्ष आहेत. त्यांच्याकडून वेळोवेळी सहकार्य मिळत असल्याने बऱ्याच समस्या दूर झाल्या आहेत. चांगल्या समन्वयामुळे हे शक्य झाल्याची प्रतिक्रिया बैठकीच्या सुरुवातीला जस्टीस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाठ, प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील, उपायुक्त मनीष जोशी, मधुकर बोडके, शंकर पाटोळे, दिनेश तायडे, उपनगर अभियंता विकास ढोले आणि शुंभागी केसवानी, घोडबंदर रोडवर काम करणाऱ्या यंत्रणांचे समन्वयक आणि कार्यकारी अभियंता संजय कदम, वृक्ष अधिकारी केदार पाटील, जस्टिस फॉर घोडबंदर रोडचे प्रतिनिधी, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**प्रशिक्षण आणि कार्यशाळा**

वाहतूक पोलिसांच्या सहाय्यासाठी नेमण्यात आलेले वॉर्डन आणि बस चालक यांचे सध्या रस्ता सुरक्षेबाबत प्रशिक्षण सुरू असल्याचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी सांगितले. आवश्यकता असल्यास आणखी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे. या वॉर्डनना काही ठिकाणी त्रास दिला जातो, वाहन चालक त्यांचे ऐकत नाहीत, अशी निरिक्षणे नागरिकांच्या वतीने मांडण्यात आली.

**अवजड वाहने**

स्थानिक अवजड वाहने, मुंबईकडून येणारी अवजड वाहने यांची वर्दळ बंदीच्या काळातही सुरू असते. तसेच, बाहेरील वाहने रोखून ठेवण्यावरही मर्यादा येत असल्याने या अवजड वाहनांबाबत कोणती व्यवस्था करायची यावर वाहतूक पोलीस विचार करत असल्याची माहिती उपायुक्त शिरसाठ यांनी दिली.

**आनंद नगर सिग्नल**

आनंद नगर सिग्नल येथे एकूण ११ ठिकाणी रस्ते ओलांडले जातात. त्यामुळे सिग्नल असूनही वाहतूक संचलन नीट होत नाही. त्याकरता सिग्नलची जागा बदलावी अशी सूचना नागरिकांच्या वतीने करण्यात आली. त्यासंदर्भात, पालिकेचा विद्युत विभाग आणि वाहतूक पोलीस यांनी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून तोडगा काढावा, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले.

**बेवारस वाहनांसाठी मोहिम**

रस्त्याच्या कडेला उभ्या करण्यात आलेल्या बेवारस वाहनांची मोठी समस्या घोडबंदर परिसरात आहे. त्यावर उपाय करण्यासाठी महापालिका, प्रादेशिक परिवहन विभाग आणि वाहतूक पोलीस यांनी एकत्रितपणे मोहीम हाती घ्यावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले. सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडून ही वाहने हटविण्यात यावीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

# फडके मैदानलगतच्या नाल्याच्या दुर्गंधीमुळे मैदानात दरवळ

**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण पश्चिमेतील फडके मैदानात सकाळी संध्याकाळी फेरफटका मारित मोकळ्या हवेत फिरण्यास अबाल वुध्दापासून युवक युवती हे येतात. परंतु मोकळ्या हवेत फेरफटका मारित चालण्याचा व्यायाम करीत आरोग्य प्रश्नाबाबत दक्ष असणार्या नागरिकांच्या वाट्याला या फडके मैदाना लगतच्या सांडपाणी मिश्रीत दुर्गंधीयुक्त पाणी वाहत असलेल्या नाल्याच्या दरवळीचा सामना करावा लागत आहे.

कल्याण पश्चिमेतील टिळक चौक, पारनाका, ठाणकरपाडा, लालचौकी, वाडेघर, आधारवाडी, मोहिंदर कॉलेज परिसर, रमाबाई आंबेडकर नगर आदी परिसरातून मोठ्या प्रमाणात सकाळ, संध्याकाळ छोटे कंपनी, युवक युवती, महिला, पुरूष, जेष्ठ नागरिक मोकळ्या हवेत फेरफटका मारण्यासाठी येतात. काहीजण नियमित या मैदानात चालण्याचा व्यायाम करीत असतात. आपल्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून ही सजग मंडळी महागड्या जीमच्या पाठी न जाता फडके मैदानात खुल्या वातावरणात आपल्या आरोग्याच्या हितासाठी



येतात. परंतु नियोजन शून्य लालफितीचा सावळा गोधंळ कारभारामुळे या फेरफटका मारयाला येणाऱ्या मंडळीना दुर्गंधीचा वास सहन करावा लागत आहे. हे कल्याणकर करदात्यांचे दुर्दैव म्हणावे लागेल.

या फडके मैदानालगतच्या नाल्यावर स्लॅब टाकून बंदिस्त करावा जेणेकरून मैदानात येणाऱ्यांना दुर्गंधीचा दरवळ सहन करावा लागणार नाही. खऱ्या अर्थाने नागरिकांना या मैदानाचा पुरेपूर वापर करता येईल. अधीच आरक्षित मैदाने असणारे भुखंड कमी शिल्लक आहेत. शहराचा श्वास म्हणून मैदाने गरजेची आहेत. फडके मैदान लगतच्या नाल्यातील वाहत्या पाण्याच्या दुर्गंधी प्रश्नी तसेच बंदिस्त नाला व्हावा. याबाबत शिवसेनेचे माजी नगरसेवक तथा शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले हे प्रशासनाकडे वारंवार पाठ -पुरावा करीत आहेत. सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार तीन वर्षापूर्वी फडके मैदाना लगतच्या नाल्यावर स्लॅब टाकून बंदिस्त करण्याबाबत १ कोटी खर्चाचे प्राकलन तयार केले होते. परंतु निधी अभावी तसेच नागरी आरोग्य प्रश्नाबाबत डोळसभुमिका नसल्याने अद्याप देखील ते काम मार्गी लागू शकत नाही. हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

# डोंबिवलीत कोपरमधील बेकायदा बांधकामावर कारवाई



**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) –** येथील पश्चिमेतील कोपर गाव हद्दीतील चरू बामा म्हात्रे शाळेच्या पाठीमागील बाजूस दोन महिन्यांपासून काही बांधकामधारक कल्याण डोंबिवली पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता, रस्ता अडवून एका बेकायदा बांधकामाची उभारणी करत होते. यासंदर्भात तक्रारदाराने आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्यापर्यंत तक्रारी केल्या होत्या. आयुक्तांच्या आदेशावरून बुधवारपासून ही बेकायदा इमारत जमीनदोस्त करण्याची कारवाई ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांनी सुरू केली.

डोंबिवली पश्चिमेत चरू बामा म्हात्रे शाळेच्या पाठीमागे अधिकृत कृष्णा संकुलाच्या बाजुला तीन महिन्यांपासून बांधकामधारकांनी कल्याण डोंबिवली पालिका नगररचना विभागाच्या बांधकाम परवानग्या न घेता, एका बेकायदा इमारतीची उभारणी सुरू केली होती. या बेकायदा इमारतीच्या तक्रारी तक्रारदार विनोद जोशी यांनी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त अवधुत तावडे, ह प्रभाग साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांच्याकडे केल्या होत्या. आयुक्त डॉ. जाखड यांनी विहित कार्यवाही करून हे बेकायदा बांधकाम तोडण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले होते. साहाय्यक आयुक्त सावंत यांनी या बांधकामाच्या विकासकांना तातडीने बांधकाम थांबविण्याची नोटीस दिली होती.

# जागतिक एड्स दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यात विविध जनजागृतीपर उपक्रम

**ठाणे (यश सावंत) -** जागतिक एड्स दिनानिमित्त जिल्हा एड्स कार्यक्रम नियंत्रण विभागामार्फत दि. १ डिसेंबर रोजी "जागतिक एड्स दिन" साजरा करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत ठाणे जिल्ह्यात विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. युवकांनी या जनजागृतीपर कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलाश पवार यांनी केले आले आहे.

ठाणे जिल्ह्यात जागतिक एड्स दिनानिमित्त नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. जागतिक एड्स दिन २०२४ ची थिम "Take the right path "(टेक द राईट् पाथ) ही आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

या वर्षीच्या संकल्पनेच्या माध्यमातून "मानव अधिकाराचे मार्ग स्वीकारुया, एचआयव्ही/एड्स बद्दल माहिती घेऊया, एकजुटीने एचआयव्ही/एड्स प्रतिबंधासाठी लढा देवूया, एचआयव्ही बाधितांना मुख्य प्रवाहात सामील करून घेवूया," हा संदेश युवकांपर्यंत पोचविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ठाणे जिल्ह्यात "जागतिक एड्स दिनाच्या" निमित्ताने दि.१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत अतिजोखमीचे गट/भाग/जागा/ ठिकाणांवर, स्थलांतरीत कामगारांच्या रहिवाशी तसेच कामाच्या ठिकाणी, मुख्य चौक, बाजार पेठ, गर्दीच्या ठिकाणी व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. जिल्हा व तालुका स्तरावर मोहिम अधिक प्रभावी करुन जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहचून त्यांना एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तीसोबत भेदभाव व कलंक मिटवून



समानता आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच जास्तीत-जास्त एचआयव्ही तपासणी करण्याकरिता प्रोत्साहित करण्यात येणार आहे.

युवा वर्ग हा सृजनशील असल्यामुळे विविध उपक्रमांच्या माध्यमातून युवावर्गासोबत जिल्हा, महानगरपालिका व तालुकास्तरावरील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थीनी सोबत जनजागृतीपर प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा, महानगरपालिका व तालुकास्तरावरील सर्व एआरटी केंद्रामध्ये उपचार घेत असलेल्या एच.आय.व्ही बाधीत बालकांसाठी (वय ११ वर्षे ते १८ वर्षे) चित्रकला (पोस्टर) स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

चित्रकला व रांगोळी स्पधेचे विषय :- १) एच.आय.व्ही एड्स जनजागृती २) माझ्या स्वप्नातील भारत ३) स्त्री-पुरुष समानता हे आहेत.

जिल्हा व तालुकास्तरावरील सामान्य नागरिक व महाविद्यालयातील विद्यार्थी/ विद्यार्थीनी करिता सोशल मिडिया पोस्ट मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

सोशल मिडिया पोस्ट मेकिंग स्पधेचे विषय :- १) मातेपासून तिच्या होणाऱ्या बाळास एचआयव्ही/एड्स पासून संरक्षण, २) एचआयव्ही/एड्स संक्रमणाचे मार्ग व प्रतिबधात्मक उपाय, ३) एचआयव्ही/ एड्स प्रतिबंध व नियंत्रण कायदा २०१७, ४) एचआयव्ही/एड्स जनजागृती टोल फ्री क्रमांक १०९७, ५) मादक द्रव्यांचे सेवन व त्याचे दुष्परिणाम.

त्याशिवाय, महाविद्यालयात एचआयव्ही/एड्सविषयी मुलभूत माहिती, कलंक आणि भेदवाभ, एच. आय. व्हीचा प्रतिबंध, एचआयव्ही संसर्गितीसाठी सेवा सुविधा, एच. आय. व्ही संदर्भात तरुणांची भूमिका व जबाबदारी. अशा अनेक विषयावर तज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.

अति जोखीम गट, स्थानिक रिक्षा, स्थानिक प्रवासी वाहन/टॅक्सी चे चालक व क्लिनर आणि घरेलू कामगार महिला, पुरुष व इतर यांचेकरिता जास्त प्रादुर्भात असलेल्या भागात एचआयव्ही/ एड्सविषयी माहिती व व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील सर्व शासकिय विभागांसोबत व त्यांच्या सहकार्यातून नाविण्यपूर्ण जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जागतिक एड्स दिनानिमित्त चित्रकला व रांगोळी स्पर्धेत तसेच सोशल मिडिया पोस्ट न मेकिंग स्पर्धेत भाग घेणा-या उत्कृष्ठ ३ सहभागी सीलएलएचआव्ही व सामान्य नागरिक / विद्यार्थी/विद्यर्थीनींना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

जागतिक एड्स दिन व सप्ताहाच्या निमित्ताने आय.ई.सी. बॅनर, पोस्टर्स व केबल नेटवर्कच्या माध्यमातून सर्व जनसामान्य व अतिजोखमीच्या गटांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

तालुका स्तरावर तज्ज्ञ व्यक्तीचे समुपदेशन/व्याख्यान, व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मदतीने एचआयव्ही/एड्स जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात येणार आहे. तसेच पोस्टर प्रदर्शन, एचआयव्ही/एड्स जनजागृतीपर स्टॉल लावण्यात येणार आहेत. मराएनिसंअंतर्गत ठाणे जिल्ह्यात एचआयव्ही/एड्स क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या संस्थेला प्रेरणा देण्यासाठी स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येणार आहे.

# रेश्मा शिंदे अडकणार विवाह बंधनात




'घरोघरी मातीच्या चुली'मधली जानकी असो किंवा 'रंग माझा वेगळा'मधली दीपा रेश्मा शिंदेने कायमच आपल्या अभिनयाचा एक वेगळा ठसा प्रेक्षकांच्या मनावर उमटवला. आता ही अभिनेत्री आयुष्यातील एका नवीन प्रवासाला सुरुवात करणार आहे. रेश्मा लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. तिचा घरी लग्नाआधीच्या विधींनी सुरुवात झाली असून नुकताच तिचा मेहंदी सोहळा पार पडला. याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

रेश्माच्या लग्नाची सर्वांच्याच मनात उत्सुकता निर्माण झाली आहे. कारण, अद्याप अभिनेत्रीने तिच्या होणाऱ्या नवऱ्याचं नाव गुलदस्त्यात ठेवलं आहे. तो नेमका कोण आहे? हे रेश्माने सोशल मीडियावर रिव्हिल केलेलं नाही. त्यामुळे रेश्मा नवऱ्याबद्दल केव्हा सांगणार याची प्रत्येकाच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे. अभिनेत्रीचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे ती लग्न नेमकं किती तारखेला करणार याबद्दल तिच्या काही चाहत्यांनी कमेंट्समध्ये विचारपूस केली होती. त्याचं उत्तर आता समोर आलं आहे. रेश्माने तिच्या हातावर लग्नाआधी सुंदर अशी मेहंदी काढली आहे. यामध्ये सप्तपदी, सात वचनं, नवीन सुरुवात, सनई-चौघडे, नवीन वर-वधू याबरोबरच लग्नाची तारीख सुद्धा अभिनेत्रीने रिव्हिल केली आहे. रेश्माने हातावर रेखाटलेल्या डिझाइनमधील विशेष तारीख पाहून अभिनेत्री लग्न केव्हा करणार हे सुद्धा उघड झालं आहे.

रेश्माने तिच्या हातावरच्या मेहंदीमध्ये २९ नोव्हेंबर लिहून घेतल्याचं स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे आता २९ तारखेच्या शुक्रवारी रेश्मा लग्नबंधनात अडकणार आहे. तिच्या लग्नाला मनोरंजन विश्वातील बरेच कलाकार आणि तिचे मित्रमंडळी उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, रेश्मा शिंदेचं काही दिवसांपूर्वीच केळवण पार पडलं होतं. अभिनेत्रीचं पहिलं केळवण 'रंग माझा वेगळा' मालिकेच्या टीमने केलं होतं. तर, तिचं दुसरं केळवण अभिज्ञा भावे आणि अनुजा साठे यांनी केलं होतं. यांनी मिळून 'लगोरी' मालिकेत काम केलं होतं. तेव्हापासून यांची एकमेकींशी जिवलग मैत्री आहे.

# मालिकाविश्वापासून १० वर्षे का दूर होता गिरीश परदेशी?



'या सुखांनो या', 'वहिनीसाहेब', 'सासूबाई गेल्या चोरीला', 'बेरीज वजाबाकी', 'फॉरेनची पाटलीण', अशा अनेक चित्रपटांतून प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा अभिनेता म्हणजे गिरीश परदेशी . चित्रपटांबरोबर या अभिनेत्याने अनेक मालिकांमध्ये काम केले आहे. मात्र, गेल्या १० वर्षांत तो कुठेही दिसला नाही. तो मालिकाविश्वापासून दूर होता. आता एका मुलाखतीत त्याने याचे कारण सांगितले आहे.

अभिनेता गिरीश परदेशीने नुकताच 'अल्ट्रा मराठी बझ'बरोबर संवाद साधला. यावेळी त्याला विचारण्यात आले की, १० वर्षांनंतर कमबॅक का करावंसं वाटलं? त्यावर उत्तर देताना अभिनेत्याने म्हटले, "२०१४ साली महेश कोठारेसरांची मी शेवटची मालिका केली होती. स्टार प्रवाहवर 'जयो स्तुते' ही मालिका होती. नकारात्मक भूमिका होती; जी नंतर सकारात्मक झाली. एकूणच त्याच्या पूर्वी चॅनेल्स खुली होण्याच्या आधीपासून मी अनेक वर्षे मालिका करत होतो. १९९९ पासून मालिकेत काम करीत होतो. म्हणजे तेव्हा फक्त एकच चॅनेल होतं. 'अल्फा मराठी' असं चॅनेल आलं होतं आणि 'आपलं सह्याद्री' होतं. 'सह्याद्री'मध्ये मराठी मालिकांचा स्लॉट फक्त दुपारी असायचा. तेव्हापासून मी मालिकांमध्ये कामं करत असल्यामुळे म्हणजे १९९९ ते २०१४ इतकी वर्षे मी टेलिव्हिजनवर व्यतीत केली. चांगल्या चांगल्या भूमिका केल्या; पण कुठेतरी साचलेपण यायला लागलं होतं. मी पुन्हा पुन्हा तेच तेच माध्यम करतोय. मला टेकिंग कळायला लागलं, लिखाण कळायला लागलं आणि कलाकार म्हणून मी समृद्ध आहे आणि मला ती समृद्धता अनुभवायची होती.



## येतेय नवी मल्टीस्टार मालिका लग्नानंतर होईलच प्रेम!

स्टार प्रवाह वाहिनीवर नात्यातल्या हळुवार धाग्याची गोष्ट म्हणजे लग्नानंतर होईलच प्रेम भेटीला येतेत. या मालिकेत मृणाल दुसानिस, ज्ञानदा रामतीर्थकर, विवेक सांगळे, विजय आंदळकर, अविनाश नारकर, ऋजुता देशमुख, कश्मिरा कुलकर्णी, अनुष्का पिंपुटकर, प्रसन्न केतकर, संयोगिता भावे, आभा वेलणकर, विशाल कुलथे, श्रेयस कदम, स्नेहल चांदवडकर कलाकार असतील. १६ डिसेंबरपासून सायंकाळी ७ वाजता ही नवीकोरी मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येईल.

जवळपास ४ वर्षांनंतर मृणाल दुसानिस या मालिकेतून पुनरागमन करणार आहे. नंदिनी मोहिते पाटील असं तिच्या व्यक्तिरेखेचं नाव असून समाजकार्याची आवड असणारी आणि सतत इतरांच्या हितासाठी झटणारी तिची व्यक्तिरेखा आहे. स्टार प्रवाहच्या ठिपक्यांची रांगोळी या मालिकेतून घराघरात पोहोचलेली अप्पू म्हणजेच ज्ञानदा रामतीर्थकर या मालिकेत मृणालच्या बहिणीची म्हणजेच काव्या मोहिते पाटील ही भूमिका साकाणार आहे. हजरजबाबी, प्रेमळ आणि खोडकर असणारी काव्या आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी सतत धडपडत असते. देवयानी नंतर जवळपास ८ वर्षांनंतर विवेक सांगळे या मालिकेत दिसणार आहे.

मिश्किल स्वभावाचं जन्मेजय हे पात्र तो या मालिकेत साकारणार आहे. पिंकीचा विजय असो मालिकेतला युवराज म्हणजेच अभिनेता विजय आंदळकर या मालिकेत जन्मेयजच्या मोठ्या भावाची म्हणजेच पार्थ देशमुख ही भूमिका साकारणार आहे. शांत आणि सुस्वभावी असणारा पार्थ सहसा कुणाच्या वाकड्यात शिरत नाही. वेगवेगळ्या स्वभावाच्या या व्यक्तिरेखा कश्या एकत्र येतात हे पहाणं उत्सुकतेचं असेल. मालिकेची निर्मिती शशांक गणेश सोळंकी यांच्या सेव्हेन्थ सेन्स मीडिया निर्मिती संस्थेने केली आहे. उत्कर्ष जाधव या मालिकेचं दिग्दर्शन करणार आहेत.

## 'असा' शूट झाला 'ठरलं तर मग' मालिकेचा बहुप्रतिक्षीत प्रोमो! सायलीने दाखवली झलक



'ठरलं तर मग' मालिकेत आता लवकरच अर्जुन सायलीसमोर आपलं प्रेम व्यक्त करणार असल्याचा सीक्वेन्स सुरू होणार आहे. मालिका सुरू झाल्यापासून तब्बल दोन वर्षांनी हा क्षण येणार असल्याने सगळेच प्रेक्षक याची आतुरतेने वाट पाहत आहेत. 'स्टार प्रवाह' वाहिनीने नुकताच मालिकेचा हा बहुप्रतिक्षीत रोमँटिक प्रोमो अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवरून शेअर केला आहे.

'ठरलं तर मग' मालिकेचा हा प्रोमो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. कारण, गेल्या दोन वर्षांपासून ही मालिका टीआरपीच्या शर्यतीत पहिल्या स्थानी आहे. त्यामुळे मालिकेत पुढे काय घडणार? याची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत असतात. गेल्या काही दिवसांपासून अर्जुन-सायलीच्या प्रेमात प्रिया नेहमीच काही ना काही अडथळे आणतेय असं पाहायला मिळत होतं त्यामुळे प्रेक्षक यावर काहीसे नाराज झाले होते. अखेर आता सगळे ज्या क्षणाची सर्वजण आतुरतेने वाट पाहत होते तो क्षण जवळ आला आहे.

'ठरलं तर मग' मालिकेत अर्जुन सायलीला अंगठी घेऊन प्रपोज करणार आहे. त्यामुळे या प्रोमोला अवघ्या काही तासांतच १० लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले. म्हणूनच सायलीची भूमिका साकारणाऱ्या जुई गडकरीने एक पोल घेऊन तुम्हाला शूटिंगचा BTS व्हिडीओ पाहायचाय का असं विचारलं होतं. नेटकऱ्यांचा प्रतिसाद पाहता जुईने लगेच या सीन शूट होतानाचा पडद्यामागचा व्हिडीओ शेअर केला आहे.

जुई या प्रोमोमध्ये हॉटेलच्या टेबलवर अर्जुनची वाट बघत बसलेली असते. तिच्यासमोर गुलाबाची आणि चाफ्याची फुलं ठेवलेली असतात. प्रोमोत पाहिल्यानुसार जुई मनातून चलबिचल झाल्याचा अभिनय करत आहे. रोमँटिक ट्रॅक असल्याने ब्लोअरने तिचे केस उडतील अशी सगळी व्यवस्था ऑफ कॅमेरा करण्यात आली होती. तर, हा सीन शूट होताना प्रत्यक्षात देखील मालिकेचं शीर्षक गीत बॅकग्राऊंडला वाजत होतं. त्यामुळे या सीनसाठी संपूर्ण टीमने प्रचंड मेहनत घेतल्याचं पाहायला मिळत आहे.

## एकीकडे वसुंधराचं कठोर व्रत, तर दुसरीकडे आकाशवर जीवघेणा हल्ला



'पुन्हा कर्तव्य आहे'या मालिकेत सध्या सतत नवनवीन गोष्टी घडताना पाहायला मिळत आहेत. आकाशला गोळी लागली असून, तो दवाखान्यात आहे. त्याला अजूनही शुद्ध आलेली नाही. त्यामुळे त्याच्या कुटुंबासह वसुंधरादेखील काळजीत असल्याचे दिसत आहे. आता आकाशला बरे वाटावे म्हणून वसुंधरा मोठे पाऊल उचलणार असल्याचे समोर आलेल्या प्रोमोमध्ये पाहायला मिळत आहे. झी मराठी वाहिनीने सोशल मीडियावर पुन्हा कर्तव्य आहे या मालिकेचा प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये दिसते की, वसुंधरा घराबाहेर बसली असून, तिला आकाशबद्दल काळजी वाटत आहे. आकाश अजून शुद्धीत आला नाही, असे डॉक्टरने सांगितलेले शब्द तिला आठवत आहेत. तोपर्यंत तिला, "जोगवा दे गं माय", असा आवाज ऐकू येतो. ती महिला वसुंधराला विचारते की, "काय मागशील देवीकडे?", वसुंधरा म्हणते, "माझा नवरा", ती महिला सांगते, "जंगलातल्या मंदिरात जा. हातात दिवा घ्यायचा. मंदिराला ५०१ फेऱ्या मारायच्या आणि दिवा तर अजिबात विझू द्यायचा नाही." वसुंधरा त्या महिलेने सांगितल्याप्रमाणे सर्व काही करताना दिसते. तिच्याबरोबर चिनू-मनू व बनीसुद्धा दिसत आहेत. शेवटी वसुंधरा देवीसमोर जाते आणि म्हणते, "त्यांची सगळी दुखणी मला देऊन टाक.

## "१० एपिसोडनंतर मला काढून टाकलं...", बिग बॉसच्या पहिल्या पर्वाची विजेती मेघा धाडेने सांगितला 'तो' किस्सा



प्रत्येकाच्या आयुष्यात सुख आणि दुःख दोन्ही असतात. या दोन्ही गोष्टींचा मेळ घालून पुढे जावे लागते. कलाराकांना करिअरमध्ये यशाच्या दिशेने वाटचाल करताना अनेकदा रिजेक्शनचा समाना करावा लागतो. काही कलाकारांना यासाठी फार जास्त स्ट्रगलही करावं लागतं. प्रत्येकाच्या वाट्याला वेगवेगळे अनुभव येतात. अशात मराठी बिग बॉसच्या पहिल्या पर्वाची विजेती मेघा धाडेने तिच्या आयुष्यातील असाच एक अनुभव चाहत्यांबरोबर शेअर केला आहे.

'बिग बॉस' मराठीचं पहिलं पर्व फार गाजलं होतं. या पर्वात अभिनेत्री मेघा धाडेने आपलं नाव ट्रॉफीवर कोरलं. मेघा धाडेने आजवर अनेक मालिका आणि चित्रपटांमध्ये काम केलं आहे. तिने मिळवलेल्या यशाने आज तिचा चाहता वर्गदेखील फार मोठा आहे. मात्र, यशाची पायरी चढत असताना सुरुवातीच्या काळात मेघाला एका मालिकेतून रिजेक्ट करण्यात आलं होतं. हे रिजेक्शन तिच्या फार जिव्हारी लागलं होतं.

मेघाने काही दिवसांपूर्वी 'राजश्री मराठी'ला एक मुलाखत दिली होती. या मुलाखतीमध्ये तिने हा किस्सा सांगितला आहे. "आपण विविध ऑडिशन देतो तेव्हा अनेक रिजेक्शनसुद्धा वाट्याला येतात. तुझ्या आयुष्यात असं रिजेक्शन आहे का? जे अगदी तुझ्या जिव्हारी लागलं आहे.", असा प्रश्न तिला मुलाखतीमध्ये विचारण्यात आला होता.

याला उत्तर देताना ती म्हणाली, "हो, माझी एक मालिका होती 'नूर ए नर्गिस' मी खूप मेहनतीने ती मालिका करत होते. त्या मालिकेचे ८ ते १० एपिसोड मी केले. त्यानंतर, त्यांनी मला काढून टाकलं. मी त्या पात्रासाठी मॅच्युअर वाटत नाही, मुख्य पात्र ताकदीने धरू शकेल अशी वाटत नाही, असं सांगून मला १० एपिसोडनंतर काढून टाकण्यात आलं, यामुळे मला फार वाईट वाटलं होतं."

"त्यानंतर जेव्हा जेव्हा ही मालिका टीव्हीवर यायची तेव्हा मी थेट टीव्ही बंद करायचे. मी म्हणायचे, यांना कशाला टीआरपी वाढवून देऊ. थोडावेळ त्याचं वाईट वाटू द्यायचं पण, नंतर लगेच आपण आपल्या दुसऱ्या कामाला सुरुवात करायची. तुम्हाला दुसरं काम मिळतं, मग तुमच्या मनात या सर्व गोष्टींचा अजिबात विचार नाही येत.", असं मेघाने या मुलाखतीमध्ये सांगितलं.

मुलाखतीत मेघाने पुढे दुनियादारीबद्दलसुद्धा भाष्य केलं आहे. ती म्हणाली, "या इंडस्ट्रीत खरीखुरी दुनियादारी तुम्ही रोज शिकत असता. प्रत्येक दिवशी, प्रत्येक क्षणात तुम्ही काहीतरी वेगळं शिकत असता. इतकंच नाही तर, बिग बॉसच्या घरातही मी खूप काही शिकले."

## हंगामी संसर्ग टाळण्यासाठी आवळा आणि मधाचे करा एकत्र सेवन



आवळा आणि मध या दोघांमध्ये अनेक महत्त्वाचे पौष्टिक गुण आहेत, त्यामुळे त्यांचा वापर वर्षानुवर्षे हंगामी संसर्गाशी लढण्यासाठी केला जात आहे. आवळा आणि मध यांचे एकत्रित सेवन तुमच्यासाठी अधिक फायदेशीर ठरू शकते. तापमान आणि वाढत्या प्रदूषणामुळे सर्दी, खोकला, कफ, फ्लूची लक्षणे लोकांसाठी त्रासदायक ठरत आहेत; तर यावर उपाय म्हणून आवळा आणि मध यांचे मिश्रण या आजारांवर नियंत्रण मिळवण्यात तुमची मदत करू शकतात. आवळा आणि मध तुमच्यासाठी कसे फायदेशीर ठरू शकतात, चला जाणून घेऊया...

आवळा 'व्हिटॅमिन सी'चा स्रोत आहे, जो तुमची प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतो. याचबरोबर मधामध्ये अँटीफंगल आणि अँटीमाइक्रोबियल गुणधर्म आढळतात, जे संसर्ग निर्माण करणारे बॅक्टेरिया आणि विषाणूंशी लढण्यास मदत करतात. या दोघांचे मिश्रण केल्यास रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते, ज्यामुळे तुमचे शरीर हंगामी संसर्ग आणि फ्लूच्या इतर लक्षणांशी लढण्यासाठी पूर्णपणे तयार होते. जर तुम्हाला सर्दी-खोकल्याचा गंभीर त्रास होत असेल आणि तुम्हाला वारंवार शिंका येत असेल तर आवळा आणि मध यांचे मिश्रण नियमितपणे केल्यास लगेच आराम मिळू शकतो.

**आवळा आणि मधाचे आरोग्यदायी फायदे :**

१. रोगप्रतिकारक शक्ती वाढते : आवळा व्हिटॅमिन सीने समृद्ध आहे. व्हिटॅमिन सी अँटिऑक्सिडेंट आहे, ज्याच्या सेवनाने रोग प्रतिकारक शक्ती वाढते. त्याचप्रमाणे हे जेव्हा मधाच्या अँटिऑक्सिडंट गुणधर्मांसह एकत्र केले जाते, तेव्हा ते एक पॉवरफुल रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे संयोजन बनते, त्यामुळे शरीराला पुरेशी ताकद आणि संरक्षण मिळते.

२. पचन आरोग्यासाठी फायदेशीर : आवळा आहारातील फायबरने समृद्ध आहे. जो पचनास मदत करतो, तर मधातील एन्झाईम आतड्यांसंबंधी आरोग्यास प्रोत्साहन देतात. आवळा आणि मधाच्या मिश्रणामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. नियमित सेवन केल्याने हिवाळ्यात पचनाच्या समस्यांचा धोका कमी होतो आणि नियमितपणे मलविसर्जन होण्यास मदत होते.

३. केसांची गुणवत्ता सुधारते : केसांची गुणवत्ता सुधारण्यासाठी आवळा अनेक वर्षांपासून वापरला जात आहे. आवळ्यामध्ये असलेल्या व्हिटॅमिनसह आणि मधाचे मॉइश्चरायझिंग गुणधर्म केसांच्या आरोग्यासाठी खूप प्रभावी उपाय ठरू शकतात. आवळा आणि मधाचे मिश्रण केसांची गुणवत्ता तर वाढवतेच, पण केसांना चमक आणि ताकदसुद्धा देते.

४. डिटॉक्सिफिकेशन : आवळ्याचा डिटॉक्सिफायिंग गुणधर्म यकृताच्या कार्यास समर्थन देतो, तर मध शरीराच्या नैसर्गिक डिटॉक्सिफिकेशन प्रक्रियेस मदत करतात, म्हणून आवळा आणि मध यांचे मिश्रण शरीरातील विषारी पदार्थ काढून शरीर निरोगी आणि संतुलित ठेवण्यास मदत करतात.

५. श्वसनाचे आरोग्य : आवळ्यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी श्वसनाचे आरोग्य सुधारण्यास मदत करते.




▶▶ **मेष** – नोकरीच्या ठिकाणी आनंदाचे वातावरण असेल. गैरसमज निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्या. घरातील कामे वाढतील.

▶▶ **वृषभ** – सामाजिक कामात आपण अधिक सक्रिय व्हाल. रागाच्या भरात वादविवाद होऊ शकतात. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.

▶▶ **मिथुन** – वृद्ध व्यक्तींच्या प्रकृतीत सुधारणा होऊ शकते. आपल्या हातून दुसऱ्यांचं चांगलं काम होईल. वरिष्ठ कामाची प्रशंसा करतील.

▶▶ **कर्क** – व्यावसायिक क्षेत्रात क्षुल्लक अडचणी जाणवतील. वाटाघाटीत यश मिळेल. कल्पनाशक्तीला चालना मिळेल. वसुली कराल.

▶▶ **सिंह** – मान मिळेल. कामात उत्साह वाटेल. वरिष्ठांच्या बरोबरीने काम करावे लागेल. आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

▶▶ **कन्या** – महत्त्वाचे काम रेंगाळण्याची शक्यता आहे. मित्रांसमवेत मौजमजा कराल. शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य उत्तम राहील.

▶▶ **तूळ** – कला क्षेत्रात रमाल. सार्वजनिक ठिकाणी अपमान होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. प्रिय व्यक्तींची भेट आनंद देईल.

▶▶ **वृश्चिक** – किरकोळ कारणाने तुमचा उत्साह कमी होऊ शकतो. महत्त्वाचे काम करता येईल. एखादा निर्णय घेण्यास वेळ लागेल.

▶▶ **धनु** – थट्टा-मस्करी करताना सावध राहा. प्रवासाची संधी मिळेल. सामाजिक जीवनात मान-सन्मान मिळेल. नवीन खरेदी कराल.

▶▶ **मकर** – महत्त्वाचे काम करून घ्या. विचारांना चालना मिळेल. विरोधक किरकोळ अडचण निर्माण करतील. इतरांना मदत कराल.

▶▶ **कुंभ** – नोकरीत चुकीचे काम करू नका. नियोजित काम पूर्ण झाल्यामुळे उत्साह वाढेल. आपल्या जोडीदाराचा हट्ट पुरवाल.

▶▶ **मीन** – आवडते पदार्थ खाण्यास मिळतील. नोकरीत कामाचा व्याप वाढेल. कौटुंबिक सौख्य लाभेल. कुठलीही चर्चा संयमाने करा.

# बंगळुरुतील कांदा व्यापाऱ्याची पाच लाखांची फसवणूक

**पुणे (अभिजित येरल्लू) :** बंगळुरुतील कांदा व्यापाऱ्याची पाच लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. कांदा व्यापाऱ्याने पैसे दिल्यानंतर त्याला कांदा पाठविला नाही. याप्रकरणी मार्केट यार्ड पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.



धनंजय खुशालचंद बोरा असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. याबाबत शशीकुमार टी. वैद्यलिंगम पिल्लई (वय ४६, रा. रवींद्रनगर, बंगळुरू, कर्नाटक) यांनी मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शशीकुमार बंगळुरूमधील कांदा व्यापारी आहे. त्यांनी पुण्यातील मार्केट यार्ड येथील घाऊक बाजारातून कांदा खरेदीसाठी बोरा याच्याशी संपर्क साधला होता. बोरा याने मार्केट यार्डात त्याचे गाळे असल्याचे त्यांना सांगितले होते. त्यानंतर शशीकुमार यांनी त्याच्याकडून २५ टन कांदा खरेदीचा व्यवहार केला. त्यापोटी त्याला पाच लाख रुपये पाठविले. २ नोव्हेंबर रोजी ट्रकमधून कांदा बंगळुरुतील पाठविल्याचे बोराने त्यांना सांगितले. कांदा न पोहोचल्याने त्यांनी त्याच्याशी संपर्क साधला. तेव्हा ट्रकमध्ये बिघाड झाल्याचे सांगून बोराने त्यांना ट्रकमालकाच्या खात्यावर ऑनलाइन पद्धतीने दहा हजार रुपये पाठविण्यास सांगितले. शशीकुमार यांनी दहा हजार रुपये पाठविले. मात्र, कांदा बंगळुरुत पोहोचला नाही. त्यानंतर त्यांनी बोरा याच्याशी संपर्क साधला. तेव्हा बोराने उडवाउडवीची उत्तरे दिली.

फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

# जयपूर-मुंबई एक्स्प्रेसमधील गोळीबार प्रकरण:
# घटनेच्या दिवशी आरोपी चेतन सिंह याचे वर्तन विक्षिप्तपणाचे

**मुंबई (विशाल कारंडे) :** जयपूर-मुंबई एक्स्प्रेसमध्ये बेछूट गोळीबार करून तीन प्रवाशांची हत्या केल्याच्या आरोपांतर्गत अटकेत असलेला पोलीस दलाचा (आरपीएफ) हवालदार चेतन सिंह चौधरी याचे घटनेच्या दिवशीचे वर्तन हे नेहमीपेक्षा वेगळे होते. तो विक्षिप्तासारखा वागत होता, असा दावा प्रकरणातील तक्रारदार आणि निवृत्त रेल्वे पोलिसाने बुधवारी दिंडोशी सत्र न्यायालयात उलटतपासणीदरम्यान केला.





घटनेच्या दिवशी चेतन याची तब्येत ठीक होती की नाही हे आपण सांगू शकत नाही. परंतु, त्या दिवशीचे त्याचे वर्तन नेहमीसारखे नव्हते हे आपल्या लक्षात आले होते, असा दावाही प्रकरणातील या तक्रारदार निवृत्त रेल्वे पोलिसाने केला. शिवाय, लहानपणापासून आतापर्यंत आपल्याला कधीच कौटुंबिक प्रेम, आपुलकी न मिळाल्याने आपली मानसिक स्थिती बिघडल्याचा दावा चेतनने जामिनाची मागणी करताना केला होता. आपली मानसिक स्थिती अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन सामूहिक आत्महत्या करणाऱ्या दिल्लीतील बुराडी कुटुंबासारखी असल्याचा दावाही त्याने केला होता.

घटनेच्या दिवशी चेतन याची तब्येत ठीक होती की नाही हे आपण सांगू शकत नाही. परंतु, त्या दिवशीचे त्याचे वर्तन नेहमीसारखे नव्हते हे आपल्या लक्षात आले.होते. विशेष म्हणजे, चेतन हा मानसिकदृष्ट्या आजारी होता आणि त्याच्यावर उपचार सुरू होते, असा दावा त्याच्या कुटुंबीयांनी आणि वकिलांचा आहे.

## वरिष्ठांसह तीन प्रवाशांची हत्या केल्याचा आरोप

जयपूरहून मुंबईला येणाऱ्या गाडीत सिंह याने आपल्या वरिष्ठासह तीन प्रवाशांवर गोळ्या झाडून त्यांची हत्या केल्याचा त्याच्यावर आरोप असून त्याच्यावर दिंडोशी सत्र न्यायालयात खटला चालवण्यात येत आहे. घटना घडली त्या वेळी तक्रारदारही सिंह याच्यासह गाडीत होता. चेतन याचे वकील राजेंद्र पाटील यांनी या साक्षीदाराची उलटतपासणी घेतली त्या वेळी, आपण आरोपीसह १० ते १२ वेळा काम केल्याचे त्याने सांगितले. तसेच, कर्तव्यावर असताना आरोपीने सहकारी आणि कर्मचारी यांच्याशी कधीही भांडण किंवा बाचाबाची केल्याचे जयपूर-मुंबई एक्स्प्रेसमधील घटनेपूर्वी आपण कधीच पाहिले नव्हते, असा दावाही या साक्षीदाराने केला.

**SPORT**

# Mohammed Shami told to do this by BCCI to save international career



Mohammed Shami has reportedly found himself in a race against time to return to the Indian Test team for the ongoing Border-Gavaskar Trophy 2024-25 in Australia. After a long injury layoff, Shami recently marked his return to competitive cricket with an impressive performance for Bengal in the Ranji Trophy 2024-25 against Madhya Pradesh in Indore.

However, the seasoned Indian pacer Mohammed Shami's selection for the marquee five-match Test series between Australia and India depends on clearing multiple fitness benchmarks in the ongoing Syed Mushtaq Ali Trophy (SMAT) 2024-25.

It is being said that Mohammed Shami is under close observation by the Board of Control for Cricket in India's (BCCI) medical team. The BCCI's medical team has been closely monitoring Shami's recovery post-surgery.


The very significant part of the crucial evaluation is achieving improved fitness levels and shedding excess weight, as these factors will be important for Mohammed Shami's endurance and long spells in the Test matches.

The medical team is optimistic that consistent game time will help Mohammed Shami regain peak fitness. Bengal's matches in the ongoing Syed Mushtaq Ali Trophy 2024-25 are being used as a crucial parameter to assess his progress to take the final call on his Australia tour.

A BCCI source was quoted as saying by Times of India on November 22: "What one needs to see is when he can let go of the dependency on the BCCI's medical team, which is treating him after every spell he is bowling. The medical team feels he will start losing weight as he keeps playing matches, which will help build his endurance. Since the Ranji Trophy leg is over, the first round of SMAT matches has been kept as a makeshift yardstick."

Meanwhile, reports suggested that BCCI's head of sports science, Nitin Patel, and National Cricket Academy (NCA) trainer, Nishant Bordoloi, are overseeing Mohammed Shami's training and recovery program during his stint with the Bengal team.

If his recovery goes as planned, Shami could potentially return to the Indian lineup for the third Test of the ongoing Border-Gavaskar Trophy 2024-25 against Australia, which is set to begin on December 14 at The Gabba, Brisbane.



# "Are These Legends Fools?" Prithvi Shaw Blasted For 'Ignoring' Sachin Tendulkar, Others' Advice

Out-of-favour India batter Prithvi Shaw is having a tough time in cricket. He could not find any takers at the IPL 2025 mega auction in Jeddah, Saudi Arabia. The 2018 U-19 World Cup winning captain was seen as the next big thing in Indian cricket, but his downfall in the past few years has taken him out of consideration for the Indian cricket team. What has become worse is the fact that Shaw will not be seen playing in IPL in the upcoming season too. Twice his name came up at the auction and despite a base price of Rs 75 lakh, not one paddle went up for him.

This will be the first time since Shaw's IPL debut, in 2018, that the right-handed batter will not feature in a season.

Apart from lack of form, Shaw has also received a lot of criticism for his behaviour and fitness from various former India cricketers and experts. Now a former India selector has questioned his improvement.

"Prithvi has been in Delhi Capitals. In DC itself, he had a chance to interact with Rahul Dravid, who was also his U-19 India coach, Ricky Ponting, Sourav Ganguly," a former India selector, who has watched Shaw from close quarters told PTI.

"It's an open secret in Mumbai cricket that Tendulkar has also spoken to him. Are these legends fools? Do you see any change in him? Even if there is, it is not evident," he added.

At the IPL 2025 auction, no one was remotely interested in Shaw, who had blazed into the collective consciousness of Indian fans with his boyish charm and a game to match.

But six years is a long time and after the IPL rejection, Shaw now stands at the crossroads in his career --- it can either go boom or bust depending on what he wants to make out of his talent.

In Indian cricket, there's a saying that perception travels faster than light and in case of Shaw, there's nothing positive coming from any quarter. Even Mumbai Cricket Association (MCA) dropped him from Ranji Trophy squad for being unfit before calling him back for Syed Mushtaq Ali Trophy.

# KL Rahul shocks Delhi Capitals owner!! Demands a place in a different team

In a surprising twist after his big IPL 2025 move, KL Rahul made waves with a cheeky football-related query to his new franchise boss, Parth Jindal, the co-owner of the Delhi Capitals (DC) franchise.



He was recently snapped up by Delhi Capitals for a hefty INR 14 crore at the mega auction. Having moved from Lucknow Super Giants to the Delhi Capitals, the right-handed batter became an instant front-runner for the captaincy role ahead of the IPL 2025, but what truly caught everyone's attention was Rahul's playful viral moment on social media.

Actually, KL Rahul posted a clip on his Instagram story, where he can be seen fielding at backward point, and he casually juggled the cricket ball with his feet before finally grabbing it with his hands, showcasing his football skills in a moment that left even Australian commentators in awe.

Sharing the video on Instagram, KL Rahul asked the new IPL franchise boss, Parth Jindal, if there are any openings at Bengaluru FC. Notably, Jindal, the co-owner of the Delhi Capitals, is also the managing director of the JSW Group which owns the Bengaluru-based franchise in the Indian Super League (ISL).

After acquiring KL Rahul at the IPL 2025 mega auction, Parth Jindal said that he shares a good relationship with the Indian batter and hinted at making him the DC captain ahead of the IPL 2025. Parth Jindal was quoted as saying by ESPNcricinfo, "I spoke to KL but haven't met him yet. I know him very well personally; I will understand from him (what he thinks), and it will boil down to what the coaching group and finally what Kiran (Grandhi, the co-owner) and I want to do. There's a lot of time for that."

# 'Loyalty is expensive' - Aakash Chopra names Venkatesh Iyer's cheap replacements for KKR

**New Delhi -** Defending champions Kolkata Knight Riders broke the bank to acquire the services of Venkatesh Iyer for INR 23.75 crore. He was one of the big reasons behind KKR qualifying for the 2021 IPL final and in the last season, the 29-year-old made 370 runs in 14 matches at a strike rate of 158.79. Kolkata management was highly impressed by his performance and for the same reason, they decided to go the distance to have Venkatesh back in the squad. Former cricketer Aakash Chopra analysed KKR's move and highlighted that with the same money, KKR could have gotten back Phil Salt or signed KL Rahul or Ishan Kishan. He noted that a franchise often spends such a high amount for a proven captain or a cricketer who can cover different bases. Chopra stated that Venkatesh isn't that 'double-skilled' player and added that by spending heavily on him, KKR compromised their auction strategy.

"They couldn't retain the Iyers



(Shreyas and Venkatesh) and they probably knew that they would get only one of them when they went into the auction. They didn't go for their captain but for Venky. When you spend 23.75 crore for one player, you think he will either become this team's captain or will be a double-skilled player at least but he is neither of them," Chopra said on his YouTube channel.

"Loyalty is expensive, it is absolutely right. When you spend so much money on a player, your balance is compromised somewhere or the other. Then you start thinking whether you could have picked Salt instead of him. You would have got Salt for 12 crore and were getting KL Rahul for 14 crore, or else Ishan Kishan. He also could have opened," the 47-year-old added.

With Shreyas Iyer gone, KKR will have to appoint a new captain ahead of the forthcoming season. Chopra recalled the options in Rinku Singh, Sunil Narine, Venkatesh, Ajinkya Rahane, Manish Pandey and Moeen Ali but couldn't pinpoint one name that the franchise can consider.

# मुंबई विद्यापीठातर्फे पुनर्मूल्यांकनासाठी दरवर्षी लाखोंचा खर्च

● मुंबई, राकेश गायकवाड :

पुनर्मूल्यांकन प्रक्रियेसाठी मुंबई विद्यापीठाकडून दरवर्षी लाखो रुपये खर्च केले जात असल्याची धक्कादायक बाब माहितीच्या अधिकारातून उघड झाली आहे. त्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या मूल्यमापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२१ ते २०२४ या चार वर्षांच्या कालावधीत मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या कला, वाणिज्य, विधि, विज्ञान, तंत्रज्ञान विद्याशाखेच्या विविध परीक्षांच्या पुनर्मूल्यांकनासाठी किती रुपये खर्च करण्यात आले, यासंदर्भातील सत्र आणि वर्षनिहाय सांख्यिकी माहिती पुण्यातील माहिती अधिकार कार्यकर्ते विहार दुर्वे यांनी माहिती अधिकाराअंतर्गत मागितली होती. त्यानुसार मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा देयक विभागाकडून संबंधित खर्चाची एकत्रित सांख्यिकी माहिती उपलब्ध करण्यात आली. या माहितीनुसार पुनर्मूल्यांकनासाठी २०२१ मध्ये १ लाख १५ हजार १२५ रुपये खर्च करण्यात आले. करोनाकाळामुळे इतर वर्षांच्या तुलनेत २०२१ या वर्षात पुनर्मूल्यांकनासाठी कमी पैसे खर्च करण्यात आले. त्यानंतर २०२२ या वर्षात ३ लाख ३१ हजार ४७५, २०२३ या वर्षात ३ लाख ६१ हजार ८५५ रुपये खर्च करण्यात आले होते.

मुंबई विद्यापीठातर्फे एका विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून २५० रुपये आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून १२५ रुपये शुल्क घेण्यात येते. तर, एका विषयाच्या उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींसाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५० रुपये आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना २५ रुपये मोजून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. मात्र




एका उत्तरपत्रिकेची पुर्नतपासणी करण्यासाठी शिक्षकाला अवघे २५ रुपये दिले जातात आणि गरज असल्यास काही शिक्षकांना प्रवासी भत्ताही दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून एवढे पैसे का घेतले जातात ? पुनर्मूल्यांकनानंतर पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी उत्तीर्ण होत असतील, तर ही विद्यापीठाच्या मूल्यमापनातील चूक असून विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड का ? असे प्रश्नही विहार दुर्वे यांनी उपस्थित केले आहेत.

'बहुसंख्य विद्यार्थी हे पुनर्मूल्यांकनानंतर उत्तीर्ण होतात, परिणामी विद्यापीठाच्या चुकीमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. तसेच उत्तरपत्रिकांच्या तपासणीसाठी शिक्षकांना कमी मानधन दिले जाते. पण त्याच वेळी विद्यार्थ्यांकडून शुल्कापोटी जास्त पैसे घेतले जातात. त्यामुळे मुंबई विद्यापीठाने पुनर्मूल्यांकन आणि उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींसाठी विद्यार्थ्यांकडून कमी पैसे घ्यावेत. तसेच जेव्हा विद्यार्थी पुनर्मूल्यांकनानंतर उत्तीर्ण होईल, तेव्हा विद्यार्थ्यांना निम्मे पैसे परत द्यावेत', असे मत विहार दुर्वे यांनी व्यक्त केले. एका विषयासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून २५० रुपये व राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून १२५ रुपये शुल्क आहे. उत्तरपत्रिका छायाप्रतींसाठी ५० रुपये शुल्क आहे.

### 'अत्यंत काळजीपूर्वक तपासणी'

■ पुनर्मूल्यांकनानंतर संबंधित विद्यार्थ्याची निकाल प्रक्रिया पुन्हा नव्याने राबवावी लागते. तसेच सदर विद्यार्थ्याची गुणपत्रिका ही नव्याने तयार करून त्याला देण्यात येते. निकाल प्रक्रिया करणारा विभाग हा विनाअनुदानित स्वरूपातील असून कर्मचाऱ्यांच्या मानधनासह इतर खर्चही असतो. पुनर्मूल्यांकनासाठी आकारण्यात येणाऱ्या रक्कमेत केवळ उत्तरपत्रिका तपासणाऱ्या शिक्षकांचे मानधन नसते. तर एकूण प्रशासकीय व संपूर्ण प्रक्रियेचा खर्च पाहून ती रक्कम आकारली जाते. तसेच, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची अत्यंत व्यवस्थितपणे तपासणी केली जाते. त्यामध्ये त्रुटी राहू नयेत, याची विशेष काळजी घेतली जाते, असे विद्यापीठ प्रशासनानाने स्पष्ट केले.

# माऊलींचा ७२८वा समाधी सोहळा लाखो वारकऱ्यांच्या साक्षीने पडला पार




● आळंदी, अभिजीत येरल्लू :

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा ७२८ वा संजीवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात पार पडला. तीन दिवसांपासून अलंकापुरी आळंदीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले आहेत. ग्यानबा तुकाराम, ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम या जयघोषाने आणि टाळ मृदंगाच्या गजरात अवघी आळंदी दुमदुमून गेली. मुख्य मंदिरावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली.

सकाळी माऊलींच्या समाधीवर दुग्धआरती व अभिषेक करण्यात आला. संत नामदेव महाराजांच्या हस्ते किर्तन सेवा देण्यात आली. यावेळी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधी मंदिरावर फुलांची सजावट करण्यात आली होती. योगी, तपस्वी, समाधिस्त माऊली या ओळी नुसार माऊलींचा ७२८ वा संजीवन समाधी सोहळा लाखो वारकऱ्यांच्या साक्षीने संपन्न झाला. अलंकापुरी आळंदीत उपस्थित वारकरी हळवे झाल्याचे पाहायला मिळाले. फुलांची उधळण करत माऊलींना निरोप देण्यात आला. सकाळी नऊ ते बाराच्या दरम्यान ह.भ.प नामदेव महाराजांचे संजीवन समाधी सोहळ्याचे कीर्तन झाले. मग, घंटानाद, पुष्पवृष्टी आणि आरती करण्यात आली. या सोहळ्यासाठी आलेल्या शेतकरी वारकऱ्यांनी महायुतीकडून अनेक अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतमालाला योग्य भाव मिळावा अशी मागणी वारकऱ्यांनी सरकारकडे केली आहे.

# सत्तास्थापनेच्या हालचालीत सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर

● अमरावती, नितीन देवळेकर :

सोयाबीन हमीभावाने खरेदी करण्याच्या आणि सोयाबीन, कापसासाठी भावांतर योजना लागू करण्याच्या महायुतीच्या घोषणेनंतर बाजारात सोयाबीनचे दर किंचित वाढले, पण आता राज्यात सत्तास्थापनेच्या हालचाली सुरू असताना विदर्भात शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी किमतीत सोयाबीन विकावे लागत आहे.

सोयाबीनला सरकारने ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल हमीभाव जाहीर केला आहे. सध्या विदर्भातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सोयाबीनला ४ हजार ते ४ हजार २०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे.

यंदा हंगामाच्या सुरुवातीपासूनच सोयाबीनचे दर कमी असल्याने सरकारने हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला. नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून १५ ऑक्टोबरपासून सोयाबीन खरेदी सुरू करण्यात आली. सुरुवातीला सोयाबीनमधील



ओलाव्याचे प्रमाण १२ टक्क्यांपेक्षा कमी हवे, या निकषामुळे खरेदीला वेग आला नाही. त्यांनंतर सरकारने ओलाव्यातील निकषात बदल केले. ओलाव्याचे प्रमाण १२ टक्क्यांहून १५ टक्क्यांपर्यंत नेण्यात आले. परंतु, यात नोंदणीची मुदत ३० नोव्हेंबरला संपणार असल्याने अडचण निर्माण झाली. बारदाण्याच्या तुटवड्याचाही प्रश्न मध्यंतरीच्या काळात निर्माण झाला. त्यामुळे हमीभाव खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकला नाही.

२७ नोव्हेंबर रोजी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत ७ हजार ३७७ क्विंटल सोयाबीनची आवक झाली. किमान ४ हजार तर कमाल ४ हजार २२१ रुपये म्हणजे सरासरी ४ हजार ११० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. २६ नोव्हेंबरला ९ हजार ९८४ क्विंटल आवक झाली आणि सरासरी ४ हजार ४० रुपये दर मिळाला. सोयाबीनच्या दरात गेल्या आठवडाभरात सुमारे तीनशे रुपयांची घसरण झाली आहे.


सोयाबीन नगदी पीक मानल्या जात असले तरी या पिकातून यंदा शेतकऱ्यांना फारसे उत्पन्न हाती लागले नाही. शेतकरी सोयाबीन पिकाच्या विक्रीवर दिवाळी साजरी करतो. यंदा हंगामाच्या प्रारंभापासूनच सोयाबीनचे दर पडले होते. सरकारने हमीदराने सोयाबीन खरेदीची घोषणा केली, तरी बाजारातील चित्र मात्र विपरीत आहे. कोणत्याच बाजारात सोयाबीन आतापर्यंत हमीदराने विकल्या गेले नाही. प्रतवारी घसरल्याने दर मिळत नसल्याचे खरेदीदारांचे म्हणणे होते.

सततच्या पावसाने सोयाबीनचे दाणे पूर्ण भरले नाहीत. त्यातच सुरुवातीच्या काळात बाजारात येत असलेल्या सोयाबीनमध्ये ओलावा अधिक प्रमाणात असल्याने भाव कमी होतात. त्याचा एकूणच परिणाम दरांवर झाल्याचे सांगण्यात आले. बारदाण्याच्या तुटवड्यामुळे हमीभाव खरेदी केंद्रांवर प्रत्यक्ष सोयाबीन खरेदीसाठी उशीर झाला. त्यातच ओलाव्याचे प्रमाण अधिक असल्याने शेतकऱ्यांना या केंद्रांवर सोयाबीन विकता आले नाही.

# महामार्गावर स्वच्छतागृहां अभावी गैरसोय व कुचंबणा महिला व जेष्ठांचे हाल

● पाली (भावना जैन) -

असंख्य चाकरमानी व प्रवासी जिल्ह्यातील विविध ठिकाणी कामानिमित्त प्रवास करतात. मात्र येथून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांची एक वेगळीच गैरसोय होत आहे. ती म्हणजे या महामार्गावर शासनातर्फे कोठेही स्वच्छतागृह उभारण्यात आलेले नाहीत. परिणामी स्वच्छतागृहा अभावी प्रवाशांची गैरसोय व कुचंबणा होते. महिला व जेष्ठांचे तर खूप हाल होतात. परिणामी प्रवाश्यांना येथील हॉटेल व



पेट्रोल पंपाचा आधार घ्यावा लागतो.

तळकोकणातून पुणे व मुंबईकडे अनेक चाकरमानी देखील ये जा करत असतात. शिवाय जिल्ह्यातील समुद्र किनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तू, किल्ले, धार्मिक स्थळे पाहण्यासाठी पर्यटकांचा ओघ कायम सुरू असतो. जिल्ह्यातून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग, मुंबई बंगलोर महामार्ग आणि माणगाव दिघी पोर्ट हे मोठे मार्ग जातात. शिवाय इतरही राज्य महामार्ग आहेत. दिवाळीला जिल्ह्यात पर्यटकांची मोठी गर्दी होती. तसेच नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणात चाकरमानी गावी आले होते. तसेच पुढील महिन्यात नाताळच्या सुट्टीत लाखो पर्यटक मुंबई, ठाणे व पुण्यावरून मुंबई गोवा महामार्ग तसेच खोपोली-पाली-वाकण राज्य महामार्ग, पाली विळे निजामपूर मार्गे माणगाव आणि इतर राज्य मार्गांवरून जिल्ह्यात फिरतील. त्यांच्यासाठी हे मार्ग अतिशय महत्वाचे आहेत. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम अजूनही सुरू आहेत. त्यामुळे या मार्गाची पुरती दुरवस्था झाली आहे.

मोठाले खड्डे पडले आहेत. त्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी देखील होते. यामुळे प्रवासात इच्छित स्थळी पोहचण्यासाठी नियमित लागणाऱ्या वेळेपेक्षा अधिक वेळ लागत आहे. परिणामी तासनतास प्रवाशांना वाहनातच बसावे लागते. अशावेळी येथे कुठेही स्वच्छतागृह नसल्याने त्यांची खूप गैरसोय होत आहे.

पान २ वर

# कोल्हापुरात सत्तेचे पहिले फळ; आवाडे टेक्स्टाईल पार्कला निधी

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :

राज्यात भाजपच्या नेतृत्वाखाली सत्ता येण्याचे संकेत असताना इचलकरंजीतील माजी वस्त्रोद्योगमंत्री प्रकाश आवाडे, भाजप आमदार राहुल आवाडे यांच्या नेतृत्वाखाली टेक्स्टाईल पार्कला १ कोटी ६६ लाख रुपयांचा निधी बुधवारी मंजूर करण्यात आला. याबाबत राज्याच्या सहकार, वस्त्रोद्योग विभागाने शासन निर्णय जारी केला असून कल्लाप्पाण्णा आवाडे को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट अँड इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्कला हा निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे सत्तेचे पहिले फळ कोल्हापूर जिल्ह्यात पोहोचले आहे. तारदाळ येथे हा टेक्स्टाईल पार्क उभारला जात आहे. याकरिता केंद्र पुरस्कृत एकात्मिक वस्तू उद्योग संकुल



योजनेतून जितका निधी दिला जाईल तितकाच निधी राज्य शासनाकडून देण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार या वस्त्रोद्योग संकुलास केंद्र शासनाने आत्तापर्यंत २२ कोटी ८९ लाख रुपयांचे अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. राज्य शासनाकडून देय ५ कोटी १५ लाख अर्थसाहाय्यातून आतापर्यंत २ कोटी ७० लाखाचे अर्थसाहाय्य वितरित करण्यात आले आहे. उर्वरित देय २ कोटी ४५ लाख पैकी १ कोटी ६६ लाख रुपये अर्थसाहाय्य आज मंजूर करण्यात आले.

# मुंबई शहरातील वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरणप्रेमींकडून चिंता व्यक्त

● मुंबई, विशाल कारंडे :

एकीकडे राजधानी दिल्लीतील वायू प्रदुषणाबद्दल चिंता व्यक्त होत असतानाच दुसरीकडे मुंबईमधील प्रदूषणात वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमींनी मुंबईमधील वाढत्या हवा प्रदूषणाबाबत चिंता व्यक्त केली आहे. सध्या समाजमाध्यमावर शहरातील काही प्रदूषित भागांची छायाचित्र टाकून 'व्हॉट वी आर ब्रिदींग' असा सवाल मुंबईकर करीत आहेत.

मागील अनेक दिवस मुंबईच्या हवेची गुणवत्ता खालावली आहे. दोन दिवसांपूर्वी संपूर्ण मुंबईतील हवेची 'वाईट' श्रेणीत नोंद झाली होती. तर काही भागात दररोज हवा 'वाईट' श्रेणीत नोंदली जात आहे.



यावर सध्या समाजमाध्यमावर अनेकजण व्यक्त होत आहेत. मुंबईतील हवा फारशी चांगली नाही. यामुळे नागरिकांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत असल्याचे ट्विट अनेक नागरिकांनी 'एक्स'वर केले आहे. याला जबाबदार कोण, आपल्या शहराला काय झाले आहे, असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहेत.

दरम्यान, या हवेमुळे अनेकांना श्वसनाचे त्रास होऊ लागला आहे. घसा खवखवणे, सर्दी, ताप ही प्रमुख लक्षणे जाणवत असून सततच्या प्रदूषित हवेमुळे हृदयविकार असलेल्यांना श्वसनास त्रास होऊ शकतो. वायू प्रदूषणाचा सर्वाधिक धोका पाच वर्षांखालील मुले आणि वृद्ध व्यक्तींना होण्याची शक्यता आहे. याचबरोबर प्रदूषित हवेमुळे गर्भावर परिणामही होऊ शकतो. दरम्यान, गेले अनेक दिवस मुंबईतील ठराविक भागातील हवा 'वाईट' श्रेणीत नोंदली जात आहे. यामध्ये प्रामुख्याने वांद्रे – कुर्ला संकुल, भायखळा, शिवडी, कुलाबा, शिवाजीनगर या परिसरांचा समावेश आहे.

# साताऱ्यात साखर सम्राटांच्या मताधिक्याने ऊस दराबाबत शेतकरी चिंताग्रस्त

● सातारा, धनश्री सट्टा :

सातारा जिल्हा हा सहकार क्षेत्रातील नावलौकिक प्राप्त जिल्हा आहे. सहकारी चळवळीमुळे अनेक प्रस्थापित घराणे राजकारणातही पुढे आले. परंतु, आता वाढत्या मताधिक्यामुळे साखर सम्राट सांगतील तोच उसाला दर अशी परिस्थिती झाल्यामुळे सातारा जिल्ह्यातील कष्टकरी ऊस उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त झालेले आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये सातारा जिल्ह्यामध्ये शेतकरी संघटनेचा फारसा प्रभाव जाणवला नाही. ऊस दराची कोंडी कायम असून शेतकऱ्यांच्या बाजूने आता बोलणारे कोणीही राहिलेले नाही. अशीच परिस्थिती आहे.



स्वतःला शेतकरी संघटनेचे नेते समजणारे सत्तेच्या वळचणी खाली गेल्यामुळे त्यांचेही चिपाड झालेले आहे. डझनभर शेतकरी संघटना पण ऊसदराबाबत आता प्रत्येकाच्या तोंडाला कुलूप लागलेले आहे. अशा वेळेला पुन्हा एकदा साखर कारखान्याचे बॉयलर पेटण्या अगोदरच दर पेटण्याची शक्यता धूसर बनत चाललेली आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये सोळा सहकारी साखर कारखाने तसेच खाजगी साखर कारखाने आहेत. एक लाख ३७ हजार १०३ हेक्टर मध्ये उसाची लागण झालेली आहे. मान खटाव सारख्या दुष्काळी भागातही आता उसाची लागवड वेग घेत आहे. सातारा जिल्ह्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्याच्या बॉयलर पेटल्यामुळे उसाचे गाळप सुरू करताना काही गावात राजकारणाची आकडेवारी ही पाहण्याचा धोका निर्माण झाला आहे. वास्तविक पाहता शेतकरी वर्ग हा ऊस दराबाबत जागृत आहे. परंतु, सध्या झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये शेतकऱ्याच्या हाती काही आलेले नाही. आजही विजेचा पुरवठा, शेती उत्पन्नाचे दर हे प्रश्न प्रलंबित आहेत. आता तर मताधिक्यामुळे साताऱ्यातील साखर कारखानदारीतील अदृश्य मालक हे आता आपण ठरवलं तोच दर देणार असल्याने शेतकरी वर्गाला पर्याय राहिलेला नाही.

सातारा जिल्ह्यात पूर्वी शेतकऱ्यांचे हित पाहून अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, स्वतंत्र सैनिक किसनवीर सहकारी साखर कारखाना, जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना, प्रतापगड सहकारी साखर कारखाना, सह्याद्री सहकारी साखर कारखाना, बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना व कृष्णा सहकारी साखर कारखाना, रयत साखर कारखाना, फलटण शुगर वर्क्स कारखाना, श्रीराम सहकारी साखर कारखाना त्याचबरोबर काही खाजगी साखर कारखाने सुद्धा शेतकऱ्यांना योग्य तो उसाचा दर देत होते. आता परिस्थिती बदलली असून साखर कारखान्यांशी थेट संबंधित काही जण आमदार झालेले आहेत. तर दोघांना पराभूत व्हावी लागलेले आहे. तरी ही रथी महारथी साखर सम्राट यांच्या मताधिक्यामुळे विधानसभेच्या अधिवेशनामध्ये साखर कारखान्याचेच प्राधान्याने आर्थिक प्रश्न मांडणार आहेत. तसेच साखर कारखान्याला जास्तीत जास्त मदत व्हावी. या दृष्टीने प्रयत्न करतील. हे आता लपून राहिलेले नाही. त्यामुळे सर्वसामान्य शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झालेले आहेत.